**अतारांकित प्रश्नोत्तरांची २३ वी यादी**

# महाराष्ट्र विधानसभा

**पहिले अधिवेशन, २०२६**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## म्हाडातर्फे बांधण्यात येणा-या घरांच्या किंमती कमी करण्याबाबत

**(१) ६१ (२७-०४-२०२५). श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या (म्हाडा) विविध मंडळातर्फे अत्यल्प व अल्प उत्पन्न गटासाठी घरांबाबत सोडत काढली जात असून ही (म्हाडाची) घरे बाजार भावापेक्षा कमी किंमतीत खरेदी करण्याची ग्राहकांना संधी असते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अलिकडच्या काळात म्हाडातर्फे देण्यांत येणारी घरे ही सामान्य ग्राहकांच्या आवाक्याबाहेरच्या किंमतीत असल्याने म्हाडा प्रशासनावर ४०० पेक्षा जास्त घराची किंमत कमी करण्याची वेळ आलेली असल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापुढे निघणाऱ्या सर्वच साडेतीतील घरांच्या किंमती या सामान्य ग्राहकांना परवडतील अशा पध्दतीने करण्यासाठी शासनाने समिती नेमली असून त्या माध्यमातून किंमती ठरवितांना पुनर्विचार करण्यात येणार आहे, हेही खरे आहे काय,

(४) असल्यास, समितीच्या शिफारशीनुसार घरांच्या किंमती कमी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२२-०९-२०२५) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) शासनस्तरावर कोणतीही समिती नेमण्यात आलेली नाही. तथापि, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणांतर्गत विक्री किंमत नियंत्रित ठेवण्याच्या अनुषंगाने अभ्यास समितीचे गठन करण्यात आले आहे.

(४) म्हाडामार्फत अभिन्यासांमधील सदनिकांचे सोयी सुविधा शुल्क कमी करण्यात आले आहे. तसेच सदर अभिन्यासांमध्ये रहिवाश्यांसाठी दवाखाने, शाळा सुपर मार्केट, क्लब हाऊस, विविध उपयोगी हॉल अशा विविध सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. त्याचप्रमाणे विशेष मोहिमेचे आयोजन करून जाहीरातीव्दारे मोठ्या प्रमाणावर प्रसिध्दी करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

## परभणी येथील अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करुन त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत

**(२) २३३ (२६-०४-२०२५). :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी येथील निलंबित पोलीस निरीक्षकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करणे तसेच त्यांच्या बेहिशोबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पोलीस

महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे तक्रार केलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन शासनामार्फत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी संबंधित आरोपी पोलीस निरीक्षक यांना पोलीस उपमहानिरीक्षक, नांदेड परिक्षेत्र यांच्या दिनांक२०.१२.२०२४ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच परभणी येथील हिंसाचार प्रकरणी व मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यु प्रकरणाची चौकशी करण्यासाठी गृह विभागाच्या दिनांक १५.०१.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्त न्यायाधीश व्ही. एल. आचलिया यांच्या अध्यक्षतेखाली "एक सदस्यीय चौकशी समिती" गठीत करण्यात आली आहे. मयत सोमनाथ सुर्यवंशी यांच्या मृत्यू प्रकरणी दिनांक १५.१२.२०२४ रोजी नानलपेठ पोलीस ठाणे, जि. परभणी येथे आ.मृ. ६१/२०२५, भा.न्या.सं. २०२३ कलम १९६(१) अन्वये आकस्मात मृत्यु दाखल केला असून सदर प्रकरण मा. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, परभणी येथे न्यायप्रविष्ट आहे. तसेच आरोपीच्या बेहिशेबी मालमत्तेची चौकशी करण्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**आपले सरकार केंद्र चालकांच्या मानधनात वाढ करणेबाबत**

**(३) १५०५ (२४-०४-२०२५). श्री.संतोष बांगर (कळमनुरी), श्री.दिलीप लांडे (चांदिवली), श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.राजेंद्र गावित (पालघर), श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील नागरिकांना विविध प्रशासकीय विभागांतर्गत आवश्यक असलेले सेवा दाखले, त्यांच्या रहिवाशी क्षेत्रात कालबद्ध स्वरुपात मिळणे, तसेच इतर व्यावसायिक सेवा, बँकिंग सेवा ग्रामीण जनतेला एकाच केंद्रावर मिळाव्यात या हेतूने ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार केंद्र स्थापन करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्र येथील केंद्र चालक यांचे मानधन ग्रामपंचायत स्तरावरुन अदा करण्यात येईल, तसेच केंद्र चालकांची नेमणूक आणि कार्यपद्धती ग्रामरोजगार सेवकांप्रमाणे लागू करण्यात येईल, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर केंद्रचालकांच्या मानधनात १० हजार रुपये प्रती महिना वाढ केली असली तरी वाढत्या महागाईमध्ये ही वाढ अत्यंत अल्प असल्याने शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने यामध्ये अधिकची वाढ करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (११-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
दिनांक ११.१०.२०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये केंद्रचालकांचे (ग्रामोद्योजकांचे) मानधन ग्रामपंचायत स्तरावरून अदा करण्याचा तसेच त्यांची नेमणूक करण्याची कार्यपध्दती व इतर संबंधित बाबी ग्राम रोजगार सेवकांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. दरम्यान सदर शासन निर्णयामुळे होणारी संदिग्धता विचारात घेऊन या विभागाच्या दिनांक५.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिनांक ११.१०.२०२४ रोजीचा शासन निर्णय रद्द करण्यात आला असून केंद्रचालकांची नियुक्ती व मानधन अदायगी पूर्वीप्रमाणेच दिनांक १९.०९.२०२४ रोजीच्या शासन निर्णयातील

तरतुदीनुसार करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) केंद्र चालक/ ग्रामोद्योजक यांच्या मानधनात माहे जुलै, २०२४ मध्ये रू. ३०००/- इतकी वाढ केली असून त्यांचे मानधन रू. ७०००/- वरून रू.१०,०००/- इतके करण्यात आले आहे.
आपले सरकार सेवा केंद्र (ग्रामपंचायत) येथील केंद्र चालक हे ग्रामोद्योजक (VLE) असुन ग्रामस्थांना विविध प्रकारच्या व्यावसायिक सेवा (B२C) तसेच बँकिंग सेवा पुरविल्यावर त्याचा मानधना व्यतिरिक्त अतिरिक्त मोबदला त्यांना प्राप्त होत असतो.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूर अगरबत्ती क्लस्टरमध्ये भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या नातेवाईकाने संचालकांच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार केलेला**

**(४) १६६८ (२६-०४-२०२५). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर अगरबत्ती क्लस्टरमध्ये काम करणाऱ्या एका भारतीय सेवेतील अधिकाऱ्याच्या नातेवाईकांने संचालकांच्या संगनमताने आर्थिक गैरव्यवहार केला असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय
(२) असल्यास, सदर प्रकरणी बेलतरोडी पोलिस ठाण्यासह शासनाच्या संबधित विभागाकडे तक्रारी केल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (११-०८-२०२५) :** (१) व (२) हे अंशत: खरे आहे.
माहे डिसेंबर, २०२४ मध्ये सदर प्रकरणी फिर्यादीकडून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे भारतीय सेवेतील अधिकारी यांच्या भावाविरुध्द ओव्हन मशीन संदर्भात आर्थिक गैरव्यवहार झाल्याबाबतचा लेखी तक्रार अर्ज दाखल केला होता, तथापि घटनास्थळ हे उमरेड पोलीस ठाणे यांच्या हद्दीत येत असल्याने पोलीस ठाणे उमरेड येथे उक्त प्रकरणी चौकशी सुरु होती. तसेच प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने शासनाकडे तक्रार प्राप्त नाही.
(३) सदर प्रकरणी तक्रारदार आणि गैरअर्जदार यांमध्ये आपसी समझोता झाल्याने आणि तक्रारदार यांनी तक्रार अर्ज निकाली काढण्याबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने तक्रार अर्ज निकाली काढला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या पोलीस पदाच्या लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत शुद्धलेखनाच्या अनेक चुका आढळून आल्याबाबत**

**(५) १७१७ (२६-०४-२०२५). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या पोलीस शिपाई, पोलीस चालक, बॅड पोलीस व कारागृह पोलीस पदाच्या दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान झालेल्या लेखी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेत शुद्धलेखनाच्या अनेक चुका आढळून आल्या असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-०७-२०२५) :** (१) व (२) मुंबई पोलीस शिपाई पदाची लेखी परिक्षा दिनांक १२ जानेवारी, २०२५ रोजी घेण्यात आली असून सदर लेखी परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेत शुध्दलेखनाच्या किरकोळ २ ते ३ चुका आढळून आल्या आहेत. किरकोळ चुकांची दुरुस्ती करुन उमेदवारांना योग्य ते गुण देण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील व्यावसायिकाची करण्यात आलेली फसवणूक

**(६) २२६२ (२७-०४-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील अमित जयंतीलाल मेहता या व्यावसायिकाची सुमारे १५ कोटी रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी दिनांक २२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अंबीली पोलीस स्टेशन येथे तक्रार दाखल केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने आरोपीकडून रक्कम वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
फिर्यादी श्री.अमित जयंतीलाल मेहता यांनी आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांनी दिलेल्या तक्रार अर्जावरुन दिनांक २१/१२/२०२४ रोजी अंबोली पोलीस ठाणे, मुंबई येथे गु.र.क्र. १४४८/२०२४, कलम ४०९, ४२० भादवि अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. उक्त गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई येथे वर्ग करण्यात आला असून (आगुवि, गु.र.क्र.७४/२०२४) पुढील तपास सुरु आहे.
(२) नमूद गुन्हयातील आरोपी नामे तेजस ललीत सोनी, वय ४७ वर्षे याने मा. उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज क्र.१६०/२०२५ दाखल केला असता, सदर प्रकरणी अंतिम आदेश झालेले नसून, मा. न्यायालयाने आरोपीस या गुन्ह्यात अटकेपासून अंतरिम संरक्षण दिले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मोर्शी (अमरावती) तालुक्यातील अप्पर वर्धा धरणात मोठ्या प्रमाणात गाळसाचल्याने धरणाची पाणी साठवण क्षमता कमी झाल्याबाबत

**(७) ४१६९ (३०-०४-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी (अमरावती) तालुक्यातील अप्पर वर्धा धरणात मोठ्या प्रमाणात गाळ साचल्यामुळे पाणीसाठवण क्षमतेत घट झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाळ साचल्यामुळे शेतक-यांना पाण्याची कमतरता भासत असून भविष्यातील पाणी नियोजन करणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर धरणा अतंर्गत अमरावती जिल्हा तसेच अमरावती, नांदगाव पेठ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ तसेच वरुड मोर्शी तालुक्याला पाणी पुरवठा केला जातो त्यामुळे सदयस्थितीत १ ते २ दिवसा आढ पाणी पुरवठा केला जात असल्यामुळे भविष्यात पाणी टंचाई निर्माण होणार नाही शासन काय नियोजन करणार आहे काय, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू धरणामधील गाळ काढून धरणांची पाणी साठवण क्षमता वाढवण्यासाठी शासनाने कोणत्या उपाययोजना केल्या आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (०७-०७-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.
गाळामुळे मुळ साठ्यामध्ये घट उद्भवलेली असली तरी संकल्पित गाळ क्षमता ११४.२२ दलघमी पेक्षा प्रत्यक्ष साचलेला गाळ (सन २०२३ मध्ये परिमाणित ८८.१४ दलघमी) कमी असल्याने प्रकल्पिय जिवंत साठ्यावर विपरित परिणाम झालेला नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) नाही, हे खरे नाही.
अमरावती शहराला होणाऱ्या पाणी पुरवठ्यावर तसेच एम.आय.डी.सी. ला होणारा पाणी पुरवठा आरक्षीत असल्यामुळे संबंधित विभागाकडून मागणी होत असलेल्या पाण्याच्या परिमाणावर कोणताही विपरीत परिणाम होत नाही.
(४) जिवंत पाणी साठयावर विपरित परिणाम नसल्याने सद्य:स्थितीत सदर बाब विचाराधीन नाही.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## टाकळी (ता.जि.लातूर) येथील युवकाला मारहाण केल्यानंतर उपचारादरम्यान झालेला मृत्यू

**(८) ४८४१ (२५-०४-२०२५).** : सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) टाकळी (ता.जि.लातूर) येथील श्री.माऊली सोट या युवकाला दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी वा त्यादरम्यान बेदम मारहाण केल्यानंतर गंभीर जखमी होवून या युवकाचा दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी वा त्या सुमारास कोमामध्ये मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर हत्येप्रकरणी उर्वरित आरोपींना अटक न करणे तसेच सदर गुन्ह्यामध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिसांविरुद्ध कारवाई करण्याच्या मागणीसाठी दिनांक ५ फेब्रुवारी २०२५ रोजी वा त्या सुमारास सकल ओबीसी बहुजन संघटना, लातूर यांनी पोलीस अधीक्षक लातूर यांचेकडे तक्रार केली आहे तसेच या प्रकरणी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये लातूर येथे आंदोलने करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (२०-०५-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय, हे खरे आहे.
सदर तक्रारीतील निष्काळजीपणा करणाऱ्या पोलिसांविरुद्ध कारवाई करण्याच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांच्यामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(४) माऊली सोट खून प्रकरणी एम. आय. डी. सी. पोलीस ठाणे, लातूर येथे दिनांक ०१ नोव्हेंबर, २०२४ रोजी गु.र.क्र. ७५५/२०२४, भा.न्या.सं. कलम १०३(१), १०९, ३३३, ३५२, ३५१(२), १८९(२), १९१(२), १९१(३), १९० अन्वये एकूण आठ आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यातील सर्व आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांना न्यायालयीन कोठडी मंजूर झाली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शेनगांव (जि. हिंगोली) येथील पंचायत समिती लेखा विभागात झालेला आर्थिक गैरव्यवहाराबाबत

**(९) ७०२७ (०५-०५-२०२५). डॉ.तुषार राठोड (मुखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेनगांव (जि.हिंगोली) पंचायत समिती लेखा विभागातील भविष्य निर्वाह निधीसह इतर कपातीच्या रक्कमेचा गैरव्यवहार केल्या प्रकरणी एका कर्मचाऱ्यास सेवेतून निलंबित केले व इतर तिघांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आल्याचे माहे फेब्रुवारी,२०२५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी चौकशी समिती गठीत करुन पंचायत समिती लेखा विभागाने कंत्राटदाराकडून कामगार विमा व इतर रक्कम कपात करुन रक्कमेची देयके संबंधित विभागाकडे वर्ग न करता वैयक्तिक खात्यावर वर्ग केल्याचे चौकशी समितीच्या अहवालातून दिसून आले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीमध्ये काय आढळून आले त्यानुसार संबंधीत कर्मचारी, अधिकारी यांनी शासनाच्या पैशांचा अपहार केल्याप्रकरणात त्यांच्यावर कारवाई करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.

या प्रकरणी एकूण चार कर्मचाऱ्यांना निलंबित केले आहे.

(२) हे खरे आहे.

(३) सदर प्रकरणी जिल्हा परिषद, हिंगोली अंतर्गत लेखाधिकारी, अर्थ विभाग, जि.प. हिंगोली यांच्या अध्यक्षेखाली दिनांक २५.११.२०२४ अन्वये चौकशी समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने दिनांक १७.०२.२०२५ रोजी चौकशी अहवाल सादर केला आहे. चौकशी अहवालानुसार सन २०१८-१९ ते सन २०२३-२४ या कालावधीत जिल्हा निधी अभीकरण योजना, जिल्हा परिषद उपकर, पंचायत समिती उपकर, १५ वा वित्त आयोग व पंचायत राज सेवार्थ ई. योजनांच्या नोंदवह्यामध्ये नोंद करण्यात आलेल्या आयकर विमा,कामगार कल्याण निधी,मुल्यवर्धीत कर, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून कपात करण्यात आलेल्या जादा प्रदानाच्या वसुलीचा तपशील, बँक धनादेश चलन आणि बँक स्टेटमेन्ट इत्यादीच्या पडताळणीमध्ये रोखपालाने स्वत:च्या बँक खात्यावर व खाजगी व्यक्तीच्या बँक खात्यावर रु.४३,७७,५५९/- एवढी रक्कम वर्ग केली असल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच रु.२६,६१,३४२/- रक्कमेचे एकूण ५५ धनादेश, ग्रामपंचायत GST चे रु.९९,५५,५४३/- एवढ्या रक्कमेचे एकूण ६०६ धनादेश शासन खाती जमा केले नसल्याचे निदर्शनास आले.

सदर अपहार प्रकरणी श्री.दत्तात्रय हरिश्चंद्र शिंदे व श्री.नितीन अंबादासराव बंडाळे, सहाय्यक लेखा अधिकारी तसेच श्री.अनिल विश्वासराव गव्हाणकर, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) व श्री.नितीनकुमार मदनलाल शर्मा, कनिष्ठ सहाय्यक (लेखा) यांना सेवेतून निलंबित केले असून त्यांची विभागीय चौकशी सुरु आहे. तसेच सदर अपहार प्रकरणी या कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील विविध कारागृहांमध्ये सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१०) ७१८८ (०७-०८-२०२५). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध कारागृहांमध्ये सुरक्षा रक्षकांची २,३८६ पदे रिक्त असून एकूण मंजूर पदांपैकी सुमारे ४० टक्के पदे रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सुरक्षा रक्षकांच्या पदांची ही मोठी व सातत्याने वाढती रिक्तता तुरुंग प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर व

कैद्यांच्या सुरक्षिततेवर गंभीर परिणाम करणारी बाब आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, आवश्यक सुरक्षाबळाअभावी तुरुंगातील कायदा व सुव्यवस्थेच्या समस्या वाढत असून, सुरक्षा व्यवस्थापनात अडचणी, कैद्यांमध्ये बेशिस्त व गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर दिसून येत आहे. हे खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन तुरुंगातील सुरक्षा रक्षकांची रिक्त पदे तातडीने भरण्यासह कैद्यांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यातील गरजांची पूर्तता करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

कारागृह विभागात नविन निर्माण झालेली कारागृह शिपाई यांची १८०० पदे रिक्त होती. त्यासर्व पदांची भरतीप्रक्रिया पूर्ण झाली असून, ६३३ उमेदवारांना नियुक्ती देण्यात आली आहे. उर्वरित ११६७ उमेदवारांना नियुक्ती देण्याची कार्यवाही सूरू आहे.

नियुक्ती देण्याची कार्यवाही सुरू असलेली ११६७ पदे तसेच पदोन्नती व सेवानिवृत्तीने रिक्त झालेली ५२५ पदे अशी एकूण १६९२ पदे सद्यस्थितीत रिक्त आहेत.
(२) व (३) नाही.
(४) पदोन्नती व सेवानिवृत्तीने रिक्त झालेली ५२५ पदे व सन २०२५ अखेर रिक्त होणारी २९ पदे अशी एकुण ५५४ पदे भरण्याबाबत विनंती अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांस करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे येथील चिरागनगर मध्ये वास्तव्यास असलेल्या आदिवासी बांधवांना बेघर केल्याबाबत**

**(११) ७२१२ (१८-०८-२०२५). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे येथील चिरागनगर मध्ये सन १९४९ पासून वास्तव्यास असलेल्या आदिवासी बांधवांना एसआरए तसेच क्लस्टरच्या नावाखाली बेघर केले जात असल्याच्या निषेधार्थ तेथील रहिवाशांनी दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करुन आंदोलन केल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने बेघर केलेल्या आदिवासी बांधवांना न्याय मिळवून देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-११-२०२५) :** (१), (२) व (३) ठाणे येथील लक्ष्मी चिराग नगर झोपडपट्टीतील काही झोपडीधारक हे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसले होते. त्यानुषंगाने दिनांक ३०/०५/२०२५ रोजी राष्ट्रीय अनुसूचित जमाती आयोग, नवी दिल्ली यांचे प्रतिनिधी, उप विभागीय अधिकारी, ठाणे यांचे समवेत उपोषण करणाऱ्यांसोबत चर्चा झाल्यानंतर उपोषण मागे घेण्यात आले. सदर झोपडीधारकांची तात्पुरती राहण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.

मौ. पाचपाखडी, ता. जिल्हा, ठाणे येथील सर्वे क्र. ५०२अ (पै), ६७, ८३/४, ८४/१ ते ७ या मिळकतीवरील लक्ष्मीचिराग नगर नावाने फेड्रेशन अंतर्गत झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा प्रकल्प विकासकामार्फत राबविण्यात येत आहे. सदर योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून दिनांक ०७/१२/२०२२ रोजी आशय पत्र, IOA दिनांक ०७/०६/२०२४ व CC प्रमाण दिनांक ०९/०८/२०२४ रोजी निर्गमित करण्यात येऊन योजना मंजूर करण्यात आली आहे.

सदर योजनेत ८९ आदिवासी झोपडीधारक असून, त्यापैकी ६१ झोपडीधारकांनी संमती दर्शविली असून, उर्वरीत झोपडीधारकांनी अद्यापही संमती दर्शविली नाही. सदरचा संपूर्ण भूखंड हा रिक्त करुन विकासकाच्या ताब्यात देण्यात आलेला असून, पुनर्वसन इमारतीचे बांधकाम चालू आहे. सदर योजना पूर्ण झाल्यानंतर योजनेत समाविष्ट असलेल्या सर्व पात्र झोपडीधारकांना पर्यायी सदनिका वितरीत करुन त्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वसई (जि.पालघर) तालुक्यातील माणिकपूर पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांकडून दिवाणी प्रकरणात हस्तक्षेप करून नागरिकांना त्रास दिल्याबाबत**

**(१२) ७३६३ (१९-०९-२०२५). श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मिरा-भाईंदर-वसई-विरार (जि.पालघर) येथील पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दतील रहिवाश्यांनी त्यांच्या खाजगी मालकीच्या जागेची भूमी अभिलेख कार्यालयाव्दारे मोजणी करून त्यावर कुंपण घालत असताना माणिकपूर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सदर कुंपण घालण्यास मज्जाव केल्याची घटना फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २४ फेब्रुवारी, २०२५ रोजीच्या निवेदनान्वये सदरील बाब पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांच्या निदर्शनास आणून दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पोलीस आयुक्त कार्यालयाकडून याप्रकरणी कोणतीही कार्यवाही न केल्याने स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदन देऊन या घटनेची चौकशी करुन संबधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी पोलीस महासंचालक कार्यालयाने याबाबत पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर-वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांना दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजी दिल्यानंतरही या प्रकरणी अद्यापपर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

मिरा-भाईंदर-वसई-विरार (जि.पालघर) येथील पोलीस आयुक्तालयांतर्गत असलेल्या माणिकपूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सिटी सर्व्हे नंबर १३९/४ जमिनीचे मूळ मालक श्रीमती कैथरीन जोसेफ मिनेझीस व श्रीमती मेरी ॲलेक्स डाबरे यांची असुन सदरची मिळकत वडिलोपार्जित आहे. सन १९९५ साली त्यांनी सदर जागेत संरक्षक भिंतीचे बांधकाम केले होते.

श्री.राजन माधव गावडे यांनी दिनांक १२.०२.२०२५ रोजी, सर्वे नंबर १३९/४ या मिळकतीवर असलेली संरक्षक भिंत जे.सी.बी.मशीनच्या सहाय्याने पाडून त्यांनी बळाचा वापर केल्याने जमीन मालकांनी पोलीसांना फोन करुन पोलीसांची मदत मागितली. पोलीसांनी घटनास्थळी जावून श्रीमती मिनेझीस व श्री. गावडे यांचे म्हणणे ऐकुन घेतले व त्यांच्याकडील जमीन मिळकतीच्या कागदपत्रासंह माणिकपूर पोलीस ठाण्यात जाण्याबाबत त्यांना समज दिली. माणिकपूर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी त्यांना सदर कुंपण घालण्यास मज्जाव केल्याची बाब खरी नाही. याउलट श्री. गावडे यांनीच सर्वे नंबर १३९/४ च्या मुळ मालकांनी बांधलेली संरक्षक भिंत जे.सी.बी.मशीनचे सहाय्याने तोडली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) श्रीमती मिनीझेस व श्री. गावडे हे दिनांक १३.०२.२०२५ रोजी मणिकपूर पोलीस ठाणे येथे कागदपत्रांसह हजर झाले होते. त्यावेळी चौकशी अधिका-यांनी श्री. गावडे यांच्याकडे मिळकतीवरील बांधकाम परवानगी व मोजणी नकाशा

या कागदपत्रांची पाहणी करण्यासाठी मागणी केली असता श्री गावडे हे बांधकाम परवागनीबाबतची कागदपत्रे सादर करु शकले नाहीत.

चौकशी अधिका-यांनी श्री. गावडे व श्रीमती मिनीझेस यांना दिनांक १५.०२.२०२५ रोजी " सदर जागेबाबत आम्ही सरकारी भुमी अभिलेख अधिकारी यांना सदर जागेवर आणुन समक्ष मोजणी करणार आहे, तोपर्यंत घटनास्थळी कोणीही काहीही काम करणार नाही, सदर घटनास्थळी शांतता राहील" अशा मजकुराची भा.ना.सु.सं. कलम १६८ प्रमाणे नोटीस दोन्ही पक्षकारांना दिली आहे.

तदनंतर श्री. गावडे यांनी दिनांक २१.०२.२०२५ रोजी बांधकामात अडथळा आणला असल्याचे नमूद करुन पोलीसांविरुध्द तक्रार अर्ज दिला आहे. त्याची चौकशी देखील सहा. पोलीस निरीक्षक यांचेकडुन करण्यात आलेली असुन चौकशीत श्री. गावडे यांच्या मिळकतीचा नकाशा हा वहीवाटीनुसार असुन भूमी अभिलेखात तसा अंमल नसल्याने, सदर नकाशा हा दुरुस्तीस पात्र असल्याने, सदरचा नकाशा हा गावनकाशाचे आधारे कायम केला असल्याने, ७/१२ अभिलेख व भूमापन अभिलेख मेळात नसल्याने व त्यात दुरुस्ती होणे आवश्यक असल्याने, नकाशाच्या प्रतीवर 'क' प्रत असे हाताने लिहलेले असल्याने, श्री. गावडे यांनी चौकशीदरम्यान अदयापपावेतो बांधकाम परवानगीबाबतची कोणतीही वैध कागदपत्रे सादर केलेली नसल्याने तसेच सदर मिळकतीवर बांधकाम करण्यासाठी उपसंचालक, नगररचना यांनी कोणत्याही प्रकारची परवानगी दिलेली नसल्याने श्री. गावडे यांनी केलेले बांधकाम हे अनाधिकृत आहे असे चौकशीत निष्पन्न झाले. तसेच श्री.गावडे व श्रीमती मिनीझेस यांना नोटीस दिली असल्याने चौकशी अधिकारी यांनी सदरचा तक्रारी अर्ज निकाली काढला आहे.

विधानसभा सदस्य यांच्याकडून याच मजकुराचे अनुषंगाने प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जाची पोलीस निरीक्षक, माणिकपुर पोलीस ठाणे यांचेकडुन देखील सविस्तर चौकशी करण्यात आलेली आहे. सदर चौकशीत देखील त्यांनी दोन्ही पक्षकारांनाही संयुक्तीक, एकमेकांना प्रत्यक्ष मोजणीच्या नोटीसा देवून मोजणी करुन, हद्दीखुणा कायम करुन घेण्याबाबत समज दिली असून ती त्यांना मान्य असल्याचे त्यांनी त्यांचे जबाबात सांगीतले आहे. याबाबत विधानसभा सदस्य यांना लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे.

तसेच विधानसभा सदस्य यांचेकडुन याबाबत प्राप्त झालेल्या तक्रारी अर्जाची सहा. पोलीस आयुक्त, वसई विभाग यांच्याकडून देखील चौकशी सुरु असुन त्यांनी अदयापपावेतो केलेल्या चौकशीत निष्पन्न होणाऱ्या बाबींच्या आधारे प्रस्तुत प्रकरणी सविस्तर चौकशीअंती कायदेशीर कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

श्री. गावडे यांनी सर्वे नंबर ८१/२ पैकी जमीन मिळकतीवर कोणत्याही संरक्षक भिंतीचे काम केलेले नाही. याउलट श्री. गावडे यांनीच सर्वे नंबर १३९/४ मधील मिळकतीवर असलेली संरक्षक भिंत तोडुन, नुकसान करुन, सदरच्या मिळकतीवर अतिक्रण करुन तसेच सर्वे नंबर ८१/२ पैकी या जमीन मिळतीवर अनाधिकृत बांधकाम करुन भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम ३२९ (३), ३२४ (४), ३(५) सह एम. आर. टी.पी. कलम ५२, ५३ व ५४ प्रमाणे गुन्हा केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत आहे. तरी याबाबत श्रीमती मिनीझेस यांचेकडून कायदेशीर तक्रार प्राप्त झाल्यास योग्य ती कारवाई करण्याची तजवीज ठेवली आहे.

(५) सदर प्रकरणी सहायक पोलीस आयुक्त, वसई यांनी चौकशी केलेली असून चौकशी दरम्यान प्रभारी अधिकारी, माणिकपुर व सहा. पोलीस निरीक्षक, माणिकपुर पोलीस ठाणे यांची कसूरी दिसून आली नसल्याने कारवाई करण्यात आलेली नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील आदिवासी ग्रामीण भागात चोरीचे प्रमाण वाढल्याबाबत

**(१३) ७६१२ (१९-०९-२०२५). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर चोरीच्या घटना घडत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये ग्रामस्थांच्या पाण्याच्या मोटर, स्टील, सिमेंट व अन्य घरातील मौल्यवान वस्तू चोरीला गेल्यामुळे

गावच्या प्रमुख ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याची मागणी ग्रामस्थांकडून होत असल्याचे निदर्शनास आले आहे काय, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
पालघर जिल्ह्यात जानेवारी, २०२५ ते एप्रिल अखेर चोरीचे २१ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(२) पालघर पोलीस घटकाच्या अभिलेखावर गावच्या प्रमुख ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याचे निवेदन अथवा पत्र प्राप्त झालेले नाही.
(३) पालघर जिल्ह्यात जानेवारी, २०२५ ते एप्रिल अखेर चोरीचे २१ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यापैकी ०६ गुन्हे उघड करण्यात आले असून ०६ आरोपींना अटक करुन सदर गुन्ह्यात चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### राज्यातील ३ कंपन्यासोबत उर्जा निर्मितीसंदर्भात केलेल्या कराराबाबत

**(१४) ७८९४ (२३-०७-२०२५). श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **जलसंपदा(विदर्भ ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जलसंपदा विभागाने राज्यातील ३ कंपन्यासोबत उर्जा निर्मितीसंदर्भात दिनांक २९ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास करार केले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोणकोणत्या कंपन्यांसोबत किती रकमेचे करार केले आहेत,
(३) असल्यास, सदर कंपन्यांकडून राज्याला प्रत्येकी किती वीज मिळणार आहे, तसेच उर्जा निर्मितीच्या कराराची कालमर्यादा किती आहे,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. गिरीश महाजन (२९-०८-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे
(२) उदंचन जलविद्युत प्रकल्प, उदंचन जलविद्युत प्रकल्प तथा उपसा सिंचन योजना व सहस्थित उदंचन जलविद्युत- सौर उर्जा / इतर अपारंपारिक संकरित प्रकल्प यांना सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) मार्फत विकसित करण्याचे जलसंपदा विभागाचे दिनांक २०.१२.२०२३ च्या धोरणानुसार खालील नमूद तीन कंपन्यांसोबत सर्वेक्षण व अन्वेषण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत -
१. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (MAHAGENCO) यांची प्रस्तावित गुंतवणूक रु. २५१६० कोटी.
२. महाजेनको रिन्युअबल एनर्जी लिमिटेड (MREL) यांची प्रस्तावित गुंतवणूक रु. १७००० कोटी.
३. अवादा एक्वा बॅटरीज प्रायव्हेट लिमिटेड यांची प्रस्तावित गुंतवणूक रु. १५१०० कोटी.
एकूण सुमारे रु.५७२६० कोटी इतक्या रकमेची सार्वजनिक खाजगी भागीदारी (PPP) मार्फत गुंतवणूक कंपनी (विकासक) स्वत: उभारणार आहेत.
(३) उपरोक्त तीन कंपन्यांसोबत सर्वेक्षण व अन्वेषण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी झालेल्या सामंजस्य करारात नमूद केल्यानुसार खालील प्रमाणे वीज निर्मिती प्रस्तावित आहे

१. महाराष्ट्र राज्य विद्युत निर्मिती कंपनी (MAHAGENCO) -३१४५ मेगावॅट.
२. महाजेनको रिन्युअबल एनर्जी लिमिटेड (MREL) - २११० मेगावॅट.
३. अवादा एक्वा बॅटरीज प्रायव्हेट लिमिटेड- ३६५० मेगावॅट.
सध्यास्थितीत उर्जा निर्मितीचा करार केलेला नसल्याने प्रश्न उदभवत नाही.
(४) प्रश्न उदभवत नाही.

---

**गृहनिर्माण प्रकल्पात गुंतवणूक केलेल्या ग्राहकांची गुंतवणूक केलेली रक्कम वसूल करण्याबाबत**

**(१५) ८१०१ (१८-०८-२०२५). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर आणि पुणे येथील महारेराच्या आदेशानुसार तक्रारदाराला घरासांठी व्याजासह, गुंतवणुक केलेली रक्कम परत न करणाऱ्या विकासकांविरोधात वसुली आदेश जारी करण्यात येऊनही अद्याप सबंधित विभागाचे जिल्हाधिकारी यांचेतर्फे विकासकाकंडुन सुमारे ६८९.९८ कोटी थकीत रक्कम वसुल करण्यात आली नसल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाने ६८९.९८ कोटी पैकी किती रक्कम वसुल करुन ग्राहकांना माहे मे, २०२५ मध्ये परत केली व अद्यापपर्यंत किती रक्कम वसूल होणे बाकी आहे, तसेच सदर रक्कम परत न करणाऱ्या विकासकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, मुंबईसह सहा जिल्ह्यातील गृहनिर्माण प्रकल्पात फसवणुक झालेल्या ग्राहकांना गुंतवणुक केलेली रक्कम तातडीने परत मिळवुन देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर आणि पुणे सहा जिल्ह्यांकडून रु. ६८४.५६ कोटी रक्कमेची वसूली प्रलंबित होती.
(२) मे, २०२५ अखेर एकूण रु. ८९१.९८ पैकी रु. २१३.७२ कोटी रक्कम वसूल करण्यात आली आहे व ग्राहकांना परत करण्यात आली आहे. सद्यस्थितीत रु. ६७८.२६ कोटी रक्कम वसूल होणे शिल्लक आहे.

सदर रक्कम परत न करणाऱ्या विकासकांविरुध्द आवश्यक ती कार्यवाही संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय/ तहसिल कार्यालय यांच्याकडून केली जात आहे.
(३) फसवणूक झालेल्या ग्राहकांना रक्कम तातडीने परत मिळवून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाने दिनांक २२ एप्रिल, २०२५ रोजीच्या शासन आदेशाव्दारे संबंधित जिल्ह्यातील अपर जिल्हाधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांची समर्पित महसूल वसूली अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पाकडून नागरीकांची होत असलेली फसवणूक**

**(१६) ८१७२ (२१-०७-२०२५). श्रीमती सरोज अहिरे (देवळाली), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.राजेश विटेकर (पाथरी), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.दौलत दरोडा (शहापूर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील गृहनिर्माण प्रकल्पाकडून नागरीकांच्या होत असलेल्या फसवणुकीच्या अनुषंगाने माहे मार्च, २०२५

मध्ये महारेराने जिल्हानिहाय किती व्यपगत प्रकल्पांना नोटीसा पाठवून प्रकल्पानी भोगवटा पत्र दिल्याचे निदर्शनास आले आहे, खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक जिल्हयातील पूर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या किती आहे,त्यापैकी किती प्रकल्पांनी भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) महारेराकडे सादर करण्यात आले आहेत, खरे आहे काय,
(३) असल्यास, ज्या प्रकल्पांकडून भोगवटा प्रमाणपत्र महारेरास प्राप्त झाली नाहीत असे किती प्रकल्प आहेत, त्यांनी तात्काळ भोगवटा प्रमाणपत्र सादर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१०-११-२०२५) :** (१) महारेरा प्राधिकरणाकडे आतापर्यंत नोंदणीकृत झालेल्या प्रकल्पांची संख्या ५१,८२६ एवढी आहे. त्यापैकी माहे मार्च, २०२५ अखेरपर्यंत १२,२८५ गृहनिर्माण प्रकल्पांच्या विकासकांना त्यांनी दिलेल्या प्रकल्पांची मुदत संपुष्टात आल्यामुळे महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाने नोटीसा बजाविलेल्या होत्या. त्यापैकी आजपर्यंत ४५०३ प्रकल्पांच्या प्रवर्तकांनी भोगवटा प्रमाणपत्रे महारेराच्या संकेतस्थळावर सादर केलेली आहेत.
(२) राज्यात महारेरा प्राधिकरणाची स्थापना दिनांक ०१ मे, २०१७ रोजी झाल्यापासून आतपर्यंत ५१,८२६ स्थावर संपदा प्रकल्प नोंदणीकृत झाले असून, त्यापैकी पुर्ण झालेल्या प्रकल्पांची संख्या १८,३३५ ऐवढी आहे. प्रवर्तकांनी भोगवटा प्रमाणपत्रे महारेराच्या संकेतस्थळावर सादर केलेली जिल्हानिहाय प्रकल्पांची माहिती खालील प्रमाणे आहे.
जिल्हा भोगवटा प्रमाणपत्रांची संख्या
पुणे ४७५८
ठाणे २१९७
रायगड २०७५
मुंबई उपनगरे १९९३
नाशिक १९००
नागपूर ८८५
पालघर ८०५
औरंगाबाद ४८५
रत्नागिरी ४०५
सांगली ३८२
मुंबई शहर ३५६
सातारा ३४६
कोल्हापूर ३३९
अहमदनगर २०१
वर्धा १७८
अमरावती १५९
सोलापूर १५४
सिंधुदूर्ग १५३
जळगांव १११
चंद्रपूर ९१
दादरा आणि नगर हवेली ५४
लातूर ४४
अकोला ४०
नांदेड ३४

यवतमाळ ३०
जालना २९
धुळे २६
उस्मानाबाद २३
बुलढाणा १६
बीड १६
दमण १३
भंडारा १२
वाशिम ०८
परभणी ०६
नंदुरबार ०४
हिंगोली ०३
गडचिरोली ०३
गोंदिया ०१
एकूण १८३३५

(३) एकूण ५२५५ प्रकल्पांच्या प्रवर्तकांनी मार्च, २०२५ पर्यंत भोगवटा प्रमाणपत्र महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरणाकडे सादर केलेली नाहीत अथवा त्यांनी प्रकल्प पुर्ण करण्याकरिताच्या वाढीव मुदतीसाठी अर्जही केलेला नाही, अशा प्रकल्पांबाबत त्यांचे प्रकल्प स्थगित ठेवण्यात आले आहेत. प्रकल्पांची बँक खाती गोठविण्यात आली आहेत. प्रवर्तकास (विकासकास) खरेदीदारा सोबत साठे करार/विक्री करार करण्यास मनाई करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सरकारी नोकरी व बदलीचे आमीष दाखवुन अनेकांची केलेली फसवणूक

**(१७) ८४२३ (१९-०९-२०२५). श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सरकारी नोकरी व बदलीचे अमीष दाखवुन अनेकांची ९८ लक्ष इतक्या रकमेची फसवणुक केल्याप्रकरणी तिघांविरुद्ध माता रमाबाई आंबेडकर (MRA) पोलीस स्टेशन, मुंबई येथे माहे मे, २०२५ मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१७-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
सदर प्रकरणी एम.आर.ए. मार्ग पोलीस ठाणे,मुंबई येथे गु.र.क्र. १२८/२५ कलम ३१८(४), ३१६(२), ३३६(२), ३३६(३), ३४०(२),३(५) भारतीय न्याय संहिता अन्वये दिनांक०९/०५/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) सदर गुन्ह्याच्या तपासामध्ये १० व्यक्तींची रुपये ९८ लाखाची फसवणुक केली असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झाले आहे.

सदर गुन्ह्यामध्ये आरोपींनी फिर्यादी व साक्षीदारांची बनावट नियुक्ती पत्रे देवून पैसे घेवून फसवणुक केल्याचे निष्पन्न झालेले आहे. एकुण २ आरोपींना कलम ३५ (३) बी.एन.एस.एस. प्रमाणे नोटीस पाठविण्यात आलेली आहे.सदर गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागरी सुरक्षा संचालनालयाने दलाच्या पुनर्रचनेसाठी आणि आवश्यक साधनसामग्रीसाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी केली असल्याबाबत**

**(१८) ८४६७ (१९-०९-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागरी सुरक्षा संचालनालयाने दलाच्या पुनर्रचनेसाठी आणि आवश्यक साधनसामग्रीसाठी निधी उपलब्ध करण्याची मागणी केली असल्याचे माहे मे २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रिक्त पदे भरण्याबाबत, अत्याधुनिक हवाई हल्ल्याची चेतावणी देणारी यंत्रणा, रुग्णवाहिका तसेच अनेक आपत्कालीन उपकरणे दुरुस्ती अशा साठी २० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्च येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने नधिी उपलब्ध करुन देण्यासह रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-११-२०२५) :**

(१) होय.

(२) व (३) १. नागरी संरक्षण संचालनालयाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे. सुधारित आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर संचालनालयातील रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करता येईल.

२. मुंबई शहराकरिता हवाई हल्ल्याची चेतावणी देणारी यंत्रणा (भोंगा प्रणाली) खरेदी करण्यासाठी रु.१० कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत नागरी संरक्षण संचालनालयाने प्रस्ताव सादर केला होता.

दरम्यान, पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर बृहन्मुंबई व इतर नागरी संरक्षण शहरामधील भोंगा इशारा प्रणालीचे नुतनीकरण करण्याकरिता तातडीची बाब म्हणून संचालनालयाने एकूण १४२ सायरन खरेदी केले असून यासाठी एकूण रु.६३,४७,५१५/- खर्च झाला आहे. यासाठीचा निधी आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, महसूल व वन विभाग यांच्याकडून संचालनालयास प्राप्त झालेला आहे.

३. नागरी संरक्षण दलाच्या मुंबई व जिल्हा स्तरावरील कार्यालयांकरिता आवश्यक असणारी २४ वाहने खरेदी करण्याकरिता अंदाजे रु.८.४७ कोटी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत संचालनालयाने प्रस्ताव सादर केला आहे. त्याअनुषंगाने, नागरी संरक्षण संचालनालय व त्यांच्या अधिपत्याखालील कार्यालयाचा वाहन आढावा मंजुर करुन, नवीन २४ वाहने खरेदी करण्यास मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव राज्यस्तरीय वाहन आढावा समितीसमोर सादर करण्याची वित्त विभागास विनंती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील २१ पोलीस अधिक्षक कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज प्रलंबित असल्याबाबत**

**(१९) ८६६१ (१९-०९-२०२५). श्री.मनोज कायंदे (सिंदखेड राजा), श्री.राजकुमार बडोले (अर्जुनी-मोरगांव), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती, बीड, भंडारा, धुळे, गडचिरोली, गोंदिया, हिंगोली, जळगाव, कोल्हापूर, नागपूर ग्रामीण, नांदेड, नंदुरबार,

नाशिक ग्रामीण, धाराशीव, पालघर, सांगली, सातारा, सोलापूर ग्रामीण, वर्धा, वाशीम ग्रामीण व बुलढाणा या पोलीस अधिक्षक कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत १०० टक्के अर्ज प्रलंबित असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मा.मुख्यमंत्री महोदयांनी प्रशासकीय कामाला गती देण्यासाठी मंत्रालयात विविध खात्यांना १०० दिवसांचा कार्यक्रम दिला असतांनाही जवळपास २१ जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालयामार्फत एकाही अर्जाचे अद्याप निराकारण करण्यांत आले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने प्रलंबित अर्जासह अन्य अर्जांबाबत कार्यवाही करुन प्रलंबित अर्ज ठेवल्याबाबत संबंधितांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१६-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) सर्व पोलीस अधीक्षक कार्यालयांकडून माहिती अधिकार अधिनियमांतर्गत प्राप्त अर्जांचा निपटारा करण्यात आलेला आहे / येत आहे.
(३) व (४) प्रश्न उदभवत नाही.

---

**नमो शेतकरी महासन्मान योजनेत तीन हजार रुपयांची वाढ करण्याबाबत**

**(२०) ८७७२ (०८-०९-२०२५). श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.नारायण कुचे (बदनापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या पंतप्रधान किसान योजनेच्या धर्तीवर शेतकऱ्यांना प्रतिवर्षी सहा हजार देणारी "नमो शेतकरी महासन्मान" योजना सुरु केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेत तीन हजार रुपये वाढवून देण्याचे आश्वासन शासनाने केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती घेवून "नमो शेतकरी महासन्मान" योजनेत तीन हजार रुपयांची वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (१०-११-२०२५) :** (१) होय,
(२) व (३) मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक२०.०३.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत "नमो शेतकरी महासन्मान निधी" योजनेतील लाभाची रक्कम वाढविण्यापेक्षा, कृषि क्षेत्राकरिता पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार राज्यातील कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषि समृध्दी योजना सन २०२५-२६ पासून राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जिवती ( जि. चंद्रपूर ) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या युवकांची अनामत रक्कम व निर्वाह भत्ता मिळण्याबाबत**

**(२१) ८७७४ (२१-०६-२०२५). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिवती (जि. चंद्रपूर) येथील औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण घेतलेल्या युवकांची अनामत रक्कम व निर्वाह भत्ता देण्यासाठी संबंधित प्राचार्य टाळाटाळ करत असल्याची बाब माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत प्रशिक्षणार्थींनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रारी देऊनही अद्याप अनामत रक्कम व निर्वाह भत्ता त्यांना मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीचा निष्कर्ष काय आहे, त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. मंगलप्रभात लोढा (०९-०७-२०२५) :** (१) व (२) शाम दादा कोलाम शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, जिवती जि. चंद्रपूर या संस्थेत कोणत्याही प्रशिक्षणार्थ्यांकडून अनामत रक्कम व निर्वाह भत्ता देण्यासाठी तक्रार दाखल करण्यात आलेली नाही.

तथापि, यासंदर्भात वर्तमानपत्रामध्ये बातमी प्रसिध्द झालेली आहे.

(३) व (४) (अ) अनामत रक्कम :- सदरहू औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ या वर्षामध्ये (१ वर्ष व २ वर्ष अभ्यासक्रम) एकुण प्रवेशित २०८ प्रशिक्षणार्थ्यांपैकी १०८ प्रशिक्षणार्थ्यांना प्रति प्रशिक्षणार्थी रु. ६०० प्रमाणे अनामत रक्कम रु. ६४,८०० परत करण्यात आली आहे.

उर्वरित १०० प्रशिक्षणार्थी यांनी त्यांच्या बँक खात्याचा तपशिल व ना-देय प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे त्यांची प्रत्येकी रु.६०० अनामत रक्कम परत करण्यात आलेली नाही.

(ब) निर्वाहभत्ता:- उक्त संस्थेमध्ये सन २०२१-२२ ते सन २०२२-२३ मधील (१ व २ वर्षाचे अभ्यासक्रम) एकूण प्रवेशित १६९ पैकी ७० पात्र प्रशिक्षणार्थ्यांपैकी ६१ आदिवासी प्रशिक्षणार्थी यांना निर्वाहभत्ता रु. ५०० प्रमाणे एकूण
रु. १,८३,०००/- रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.

उर्वरित ९ प्रशिक्षणार्थी यांनी बँक खात्याचा तपशिल न दिल्यामुळे त्यांना त्यांच्या निर्वाहभत्याच्या रक्कमेचे वाटप करता आलेले नाही. सदहू प्रशिक्षणार्थी यांनी बँकेच्या खात्याचा तपशिल दिल्यानंतर त्यांना निर्वाहभत्याचे वाटप करता येईल.

(क) विद्यावेतन :- शासन निर्णय, दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ अन्वये शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील सर्व पात्र प्रशिक्षणार्थी यांना सुधारित दराने रु. ५००/- विद्यावेतन अदा करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार सदरहू औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये सन २०२३-२०२४ ते सन २०२४- २०२५ पर्यंत प्रवेशित सर्व प्रशिक्षणार्थी यांना महाडीबीटी पोर्टलव्दारे विद्यावेतन अदा करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

**राज्यभरात कार्यरत असलेल्या कृषी पर्यवेक्षकांना पदोन्नती देण्याबाबत**

**(२२) ९०९१ (२१-०७-२०२५). श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी**

**(उरण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यभरात कार्यरत असलेल्या कृषी पर्यवेक्षकांना कृषी अधिकारी गट व (कनिष्ठ) या पदावर पदोन्नती देण्यासाठी दरवर्षी विभागीय पदोन्नती समितीची बैठक होऊन पदोन्नती देण्याची पद्धत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दरवर्षी सप्टेंबर महिन्यामध्ये ही बैठक घेणे प्रशासनाला बंधनकारक असतानाही बैठकच घेण्यात आलेली नसल्याने राज्यातील जवळपास २०० च्या वर कृषी पर्यवेक्षक कृषी अधिकारी पदोन्नतीपासून वंचित असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर विभागीय पदोन्नती समितीची बैठक सन २०२४ मध्ये न होण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरहू विभागीय पदोन्नती बैठक तातडीने घेऊन पदोन्नती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (१८-०९-२०२५) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) अंशत: खरे आहे.

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार प्रस्ताव परिपूर्ण नसल्याने, त्याबाबतची माहिती परिपूर्ण प्राप्त झाल्यावर विभागीय पदोन्नती समितीसमोर प्रस्ताव विचारात घेण्यात आला. दिनांक २८.०३.२०२५ रोजी विभागीय पदोन्नती समितीची बैठक घेण्यात आली. त्यानुसार आयुक्त (कृषि) यांचेकडून प्राप्त अहवालानुसार सामान्य प्रशासन विभागास प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर सामान्य प्रशासन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या माहितीसह पुन्हा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास सादर करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाकडून प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर शासन मान्यतेने पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी (पोकरा) योजनेच्या धर्तीवर शासनाने नवीन योजना अंमलात आणण्याबाबत

**(२३) ९२१२ (२१-०७-२०२५). श्री.दिलीपराव बनकर (निफाड), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.बाबुराव कदम - कोहळीकर (हदगाव), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांसाठी भांडवली गुंतवणुकीसाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेच्या (पोकरा) धर्तीवर शासनामार्फत नवीन योजना करण्यात येणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासाठी पिक विमाची मिळणारी भरपाई, पीक कापणी प्रयोग हा एकमेव निकष ठेवला जाणार असून अन्य निकष रद्द करण्याचे नियोजन शासनस्तरावर सुरु असल्याचे मा.कृषी मंत्री महोदयांनी सांगितले असल्याचे दिनांक ८ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याद्वारे राज्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत बारा हजार गावांचा समावेश असून उर्वरित ३२ हजार गावांतून या योजनेसाठी मागणी होत असल्याचेही मा.कृषी मंत्री महोदयांकडून सांगण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर योजना राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (०५-०९-२०२५) :** (१), (२) व (३) यापूर्वी अंमलात असलेल्या सर्वसमावेशक पीक विमा योजनेमध्ये बदल करुन राज्य शासनाने "सुधारीत पीक विमा योजना" आणि नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या

धर्तीवर कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी “कृषि समृध्दी योजना” राबविण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. सुधारीत पीक विमा योजनेंतर्गत पीक कापणी प्रयोगाच्या आधारे संबंधित महसूल मंडळामध्ये उंबरठा उत्पादनाच्या तुलनेत येणारी घट गृहीत धरुन त्यानुसार नुकसान भरपाई देय राहील. कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढवून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषि समृध्दी योजना संपूर्ण राज्यात राबविण्यात येणार आहे.
(४) सुधारीत पीक विमा योजना आणि कृषि समृध्दी योजना सन २०२५-२६ पासून राबविण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अनुक्रमे दिनांक २४ जून, २०२५ आणि दिनांक २२ जुलै, २०२५ रोजी सर्वसमावेशक शासन निर्णय निर्गमित केले आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ करणेबाबत

**(२४) ९३१० (२९-०९-२०२५). श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हिंगोली जिल्ह्यात प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ४९ हजार २६६ लाभार्थ्यांना वाढीव रु.५० हजार रुपयांची वाढ मिळणार आहे मात्र घरावर सौर पॅनल बसवणे बंधनकारक केल्याने या पॅनलला मोठ्या प्रमाणात खर्च येणार असल्याने देण्यात येणारे अनुदान कमी पडत असून त्या अनुदानात वाढ करून किमान रु. ३.५० लाख रुपयापर्यंतचे अनुदान देण्याची मागणी घरकुल धारकांकडून होत आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील काही वर्षात बांधकाम साहित्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत असल्याने एक घरकुल व सौर पॅनल सह घर बांधण्यास किमान ५ लाख रुपये खर्च येत असल्याने प्रधानमंत्री आवास योजनेतील मंजूर घरे पूर्ण होण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यानुसार योजनेतील अनुदानात आणखी वाढ करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :** (१) हे खरे नाही
(२) हे खरे नाही
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भांडुप (पश्चिम) येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच संपूर्ण भांडुप परिसरात गुंडगिरी सुरू असल्याबाबत

**(२५) ९३३३ (१९-०९-२०२५). श्री.अशोक पाटील (भांडूप पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भांडुप (पश्चिम) मुंबई येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत तसेच संपूर्ण भांडुप परिसरात पुन्हा गुंडगिरी सुरू झाले असून, मधल्या काळातील दोन घटनांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील गुन्हेगारांना पोलिसांचा धाक राहिलेला नसल्याने, गावदेवी रोड परिसरात दिनांक १२ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यादरम्यान घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही. तथापि, विधी संघर्षीत बालक मित रविंद्र चंडालिया याने टॅक रोड, भांडुप (प.) मुंबई येथे दिनांक १९.०४.२०२५ रोजी हातात तलवार घेवून वाहनाच्या काचा फोडल्या तसेच एका बेस्ट चालकास जिवे मारण्याच्या प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले असल्याने सदर बालकावर गु. र. क्र.२६६/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच आरोपी झियाउद्दीनमुनी मुनीर अन्सारी या आरोपीने वाढदिवसानिमित्त दिनांक ११.०४.२०२५ रोजी गौतम नगर, भांडुप पश्चिम येथे त्याच्या साथीदारासह BHANDUP KING ZIYA असे प्रत्येकी एक अक्षर व भादंवि ३०२, ३०७, ३८७, ३२६ यातील प्रत्येकी एक क्रमांक अशी गंभीर गुन्ह्यातील कलमाची मांडणी करून केकवर प्रश्नचिन्ह दाखविले असल्याने गु. र. क्र. २४५/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(३) विधी संघर्षित बालकाविरुध्द दाखल गु. र. क्र.२६६/२०२५ मध्ये भादंवि कलम १०९ (१), १३२, ३२४(५), १२६ (२), ३५१(३), ३५२ सह महाराष्ट्र मालमत्ता विरूपणास प्रतिबंध अधिनियम मधील कलम ३ सह भारतीय हत्यार कायदा कलम ४, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील विधी संघर्षित बालकास ताब्यात घेण्यात आले असुन त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र मा. बाल न्यायालय, डोगरी, मुंबई येथे सादर करण्यात आले आहे. तसेच गु.र.क २४५/२०२५ मधील आरोपीवर भारतीय न्यायसंहिता मधील कलम १२५, २७० सह मपोका कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर गुन्हयातील आरोपींना अटक करून त्यांच्या विरोधात दोषारोपपत्र मा. न्यायालयात सादर करण्यात येत आहे. तसेच आरोपींच्या विरोधात प्रतिबधांत्मक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## वसई विरार महानगरपालिका क्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी ठोस उपाययोजना करणेबाबत

**(२६) ९५०७ (१८-०८-२०२५). श्री.राजन नाईक (नालासोपारा), अॅड.पराग अळवणी (विलेपार्ले), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई–विरार महानगरपालिका क्षेत्रात जनगणनेनुसार सन २००१ मध्ये २ लाख ३२ हजार १४२ झोपड्या असून एकूण लोकसंख्येपैकी ९ लाख २८ हजार नागरिक झोपडपट्टीत राहत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रकल्प राबविण्यासाठी एकच प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला प्राप्त झाला असून ही योजना राबविण्यासाठी विकासक निरुत्साही असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन वसई–विरार परिसरातील मोठ्या प्रमाणात असलेल्या झोपडपट्टी विभागांचा नियोजित वेळेत विकास करण्यासाठी या परिक्षेत्रात झोपडपट्टी पुनर्वसन योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी एक संयुक्त अभ्यास समिती स्थापन करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-१०-२०२५) :** (१) वसई-विरार महापालिका क्षेत्रातील झोपड्यांचे खाजगी संस्थेकडून ड्रोन द्वारे सर्वेक्षण करण्यात आले असून, सदर क्षेत्रात एकूण २ लाख ३२ हजार १२२ झोपड्या असल्याचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

(२) व (३) मुंबई महानगरप्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे विकासकाने दिनांक ०१/०४/२०२५ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी (सु.नि. व पु.) अधिनियम १९७१ च्या कलम ३ (क) अन्वये जमीन घोषित नसताना सुद्धा झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याच्या अनुषंगाने दुर्गामाता सहकारी गृहनिर्माण संस्थेचा (नियोजित) भूसंपादनाचा प्रस्ताव सादर केला. सदर भूखंड खाजगी मालकीचा असून सदर जमिनीबाबत वसई-विरार महानगरपालिके मार्फत मा. उच्च न्यायालय तसेच,

मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल याचिकेवर मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने अनधिकृत झोपड्यांचे निष्कासन करण्यात आले आहे.

वसई-विरार महानगरपालिका हद्दीत झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता मुंबई महानगर प्रदेश झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, ठाणे यांच्याकडून महापालिका आयुक्त, स्थानिक लोक प्रतिनिधी, विकासक, वास्तुविशारद तसेच प्राधिकरणाचे अधिकारी व नागरिक यांच्यासह दिनांक २८/०२/२०२५ रोजी संयुक्त कार्यशाळा घेण्यात येऊन सदर योजनेची जनजागृती करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील छत्रपती संभाजीनगर येथे शेतकऱ्यांना कृषी विभागामार्फत सर्व योजनांना निधी देऊन प्रलंबित देयके देण्याबाबत

**(२७) ९७६६ (०८-०९-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.संजय केळकर (ठाणे) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्यासाठी शासनाने आणलेला मुख्यमंत्री शाश्वत सिंचन व यांत्रिकीकरण या योजनेसाठी केलेल्या अर्जाप्रमाणे शेतकऱ्यांची लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येऊन निधी अभावी मागील एक वर्षांपासून छत्रपती संभाजीनगर येथे या योजनाची लॉटरीच काढण्यात आली नसल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी विभागाच्यावतीने मुख्यमंत्री शाश्वत सिंचन, राष्ट्रीय कृषी विकास, भाऊसाहेब फुंडकर फळबाग, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अशा विविध योजनांच्या लाभांपासून शेतकरी वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व योजनांना तातडीने निधी देऊन प्रलंबित देयके देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (२४-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.

विद्यमान लॉटरी प्रणालीऐवजी "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" ही कार्यप्रणाली दिनांक ०१.०४.२०२५ पासून राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(२) व (३) अंशत: खरे आहे.

प्रधानमंत्री राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पिक (सूक्ष्म सिंचन) योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील ४४,८२५ शेतकऱ्यांची "प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य"या तत्त्वावर निवड करण्यात आली असून हे सर्व अर्ज प्रक्रियेत आहेत. सदर योजनेमधून आतापर्यंत छत्रपती संभाजीनगर जिल्हयाला सन २०२४-२५ मध्ये १९,९३४ लाभार्थ्यांना रु.१०१५२.२८ लाख व सन २०२५-२६ मध्ये ५,७८२ लाभार्थ्यांना रु.३०११.४७ लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

तसेच मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील १७,८५३ लाभार्थ्यांना रु.४५०४.२२ लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे. मुख्यमंत्री शाश्वत सिंचन (सूक्ष्म सिंचन) योजनेसाठी सन २०२५-२६ करिता राज्यासाठी दिनांक२४.०४.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार रु.४००००.०० लाख निधीची तरतूद करण्यात आलेली आहे.

सन २०२५-२६ साठी कृषी यांत्रिकीकरण योजनेंतर्गत एकूण रु.८७७८.७५ लाख उपलब्ध निधीपैकी छत्रपती संभाजीनगर जिल्हयाकरिता एकूण रु.३४१.४८ लाख निधी वितरीत करण्यात आला आहे.

भाऊसाहेब फुंडकर फळबाग लागवड योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्हयातील ३५५८ लाभार्थ्यांची "प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य" या तत्त्वावर निवड करण्यात आली आहे. सन २०२४-२५ मध्ये ७६५

लाभार्थ्यांना रु.४७५.८३ लक्ष व सन २०२५-२६ मध्ये ५५८ लाभार्थ्यांना रु.१९४.७० लक्ष निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत सन २०२५-२६ साठी SNA SPARSH प्रणालीवर रु.६८३३.३३ लाख इतक्या प्राप्त निधीपैकी रु.५७७२.९३ लाख इतकी रक्कम जिल्हयांना वितरीत निधी करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्हयाचा मंजूर कार्यक्रम रु.१३८४.१३ लाख असून, त्यासाठी रु.४६६.३१ लाख निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यापैकी रु.१२२.३३ लाख निधी खर्च झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील वाझर येथील को.प. बंधाऱ्याची भिंत धोकादायक झाली असल्याबाबत**

**(२८) ९९८१ (१९-०८-२०२५). श्री.सुहास बाबर (खानापूर) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खानापूर (जि.सांगली) तालुक्यातील वाझर येथील को.प. बंधाऱ्याची भिंत धोकादायक झाली असून पडण्याची स्थिती निर्माण झाली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहु बंधाऱ्याची भिंत व कठडा पडल्यास परिसरातील शेतीचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले, तद्नुसार उक्त बंधाऱ्याच्या धोकादायक भिंतीमुळे होणारी हाणी टाळण्याकरिता कोणती उपाययोजना वा कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) :** (१) अशंत: खरे आहे.

खानापूर तालुक्यातील वाझर येथील कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची भिंत सुरक्षित असून बंधाऱ्याच्या अधोबाजूकडील उजव्या तीरावरील दगडी मार्गदर्शक भिंत कमकुवत झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) बंधाऱ्याच्या अधोबाजूकडील उजव्या तीरावरील दगडी मार्गदर्शक भिंत कमकुवत झाल्याने नदीकाठाचा थोडा भाग खचण्याची शक्यता आहे. तथापि, वहित जमीनीचे नुकसान होण्याची शक्यता कमी आहे.
(३) उजव्या तीरावरील मार्गदर्शक भिंतीच्या नुकसानीची विभागीय स्तरावरून पाहणी करण्यात आली असून दुरूस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर प्रगती पथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात मराठवाड्यासह काही जिल्ह्यात खतांची टंचाई होत असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत असल्याबाबत**

**(२९) १०२८४ (१९-०८-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मराठवाड्यासह काही जिल्ह्यांमध्ये रासायनिक खतांचा सर्वाधिक तुटवडा जाणवत असून खतांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या खरिप पेरणीच्या कामावर आणि पिकांच्या उत्पादनावर परिणाम होऊन शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रायायनिक खतांच्या टंचाईमुळे शेतकऱ्यांच्या पेरणीच्या कामावर व पिकांच्या उत्पादनावर परिणाम

होण्याची शक्यता नाकारता येत नाही, त्याकरिता शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसा खत पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी कृषी विभागाने उपाययोजना केली आहे काय,
(३) असल्यास, खरिप पेरणीकरिता खतांचा पुरवठा वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन खरिप पेरणीच्या खताची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी कृषी विभागाने खत कंपन्यांवर नियंत्रण ठेवून पुरवठा व्यवस्थापन सुधारण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (०३-११-२०२५) :** (१) खरीप हंगाम २०२५ मध्ये राज्यात मंजूर आवंटनाच्या तुलनेत युरियाचा व डिएपीचा कमी पुरवठा झालेला आहे.
(२), (३) व (४) खरीप हंगाम २०२५ मध्ये राज्यात एकूण ७६७८१.३५ मे टन युरिया व १३३७३ मे टन डीएपी खताचा संरक्षित साठा करण्यात आला होता. त्यापैकी मराठवाडा विभागासाठी २०९२४.९३ मे टन युरिया व ५६३६.८० मे टन डीएपी खताचा संरक्षित साठा करण्यात आला होता. गरजेप्रमाणे संपूर्ण युरियाचा व डीएपीचा संरक्षित साठा खुला करुन शेतकऱ्यांना उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

तसेच खत कंपन्या व केंद्र शासनाकडे खताचा पुरवठा नियमितपणे होण्याबाबत पाठपुरावा करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## दादर (मुंबई) येथील कापड व्यावसायिकाची बनावट स्वाक्षरी करुन कोट्यवधी रुपयांची केलेली फसवणूक

**(३०) १०६०९ (१९-०९-२०२५). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) दादर (मुंबई) येथील एका कापड व्यावसायिकाने विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथे गाळे, सदनिका तसेच काही भूखंड खरेदी केले असून सदरहू संयुक्त मालमत्तेवर शहा कुटुंबांनी बनावट स्वाक्षरीद्वारे उक्त मालमत्ता स्वत:च्या नावे करून संबंधितांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी बाधित ज्येष्ठ नागरिकांनी माटुंगा पोलीस ठाणे, आर्थिक गुन्हे शाखा (मुंबई) तसेच मा.मुख्यमंत्री तथा गृह मंत्री महोदयांकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी मुंबईच्या आर्थिक गुन्हे शाखेमार्फत चौकशी करण्यात आली काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दादर पुर्व येथे राहाणारे ज्येष्ठ नागरीक श्री चापसी पोपटलाल शहा (कापड व्यावसाईक) यांच्या विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथे गाळे व सदनिका होत्या. तसेच त्यांनी काही भुखंड खरेदी केले होते. त्या दोन भावांच्या संयुक्त मालमत्ता होत्या. त्या संयुक्त मालमत्ता बनावट स्वाक्षरीद्वारे स्वतःच्या नावे करुन फिर्यादीची कोटयावधी रुपयांची फसवणुक केल्याची तक्रार केल्याने सदर प्रकरणी दिनांक २५.१२.२०२४ रोजी माटुंगा पोलीस ठाणे, मुंबई येथे एमईसीआर क्र. ४३४/२०२४ भारतीय न्यायसंहिता २०२३ मध्ये कलम ३१६(२), ३१८(४), ३३६(२), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३३९, ६१(२), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.
(२) होय, हे खरे आहे.
(३) मा. उच्च न्यायालयाच्या दिनांक ३१.०१.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सदर गुन्ह्याचा पुढील तपास आर्थिक गुन्हे

विभाग, मुंबई येथे वर्ग करण्यात आला आहे. सदर गुन्हा आर्थिक गुन्हे विभाग, मुंबई यांच्याकडे दिनांक ०१.०३.२०२५ रोजी वर्ग झाल्याने गु.र.क्र. २३/२०२५, नोंद करण्यात आला असून सदर गुन्ह्याचा तपास चालू आहे. सदर प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखेमार्फत करण्यात आलेल्या तपासात खालील बाबी आढळून आलेल्या आहेत :-

I) फिर्यादी यांनी त्यांचे मयत भाऊ खिमजी पोपटलाल शहा Hindu Undivided Family (HUF) मध्ये त्यांचा समावेश असून त्या एचयुएफ मध्ये फिर्यादी व त्यांचा मयत भाऊ यांनी मालमत्ता खरेदी केल्या होत्या त्या मालमत्ता आरोपींनी विक्री केल्या आहेत असा आरोप आहे. त्यानुषंगाने तपास केला असता तपासामध्ये फिर्यादी यांचा समावेश होता असे कोणतेही कागदपत्रे अदयाप मिळुन आलेली नाहीत.

II) फिर्यादी यांची डिड ऑफ डीसॉल्युशनमधील सही खाली समक्ष सही करणारे साक्षीदार यांचा भारतीय नागरीक सुरक्षा संहिता मधील कलम १८३ अन्वये जबाब नोंद करण्यात आला आहे. सदरची सही फिर्यादी यांनी स्वतः केल्याचे साक्षीदारांनी सांगितले आहे. तसेच जेष्टाराम बाग बिल्डींग हि वनिता चापसी शहा व इतरांनी स्वतःहून रजिस्ट्रार कार्यालय वरळी येथे जावून डीड ऑफ असाईनमेंट केलेले असल्याचे तपासात दिसुन आले

III) व्हाईट हाउस या भागीदारी फर्मची माहिती निबंधक भागिदारी संस्था, मुंबई यांचेकडून प्राप्त करण्यात आलेली आहे. परंतू सदर फर्ममध्ये फिर्यादी श्री चापसी शाह यांचा सामावेश दिसून येत नाही. तसेच त्यांची सदर फर्मच्या कागदपत्रांमध्ये स्वाक्षरी असल्याचे दिसून येत नाही.

IV) विरार, बोळींज, सानपाडा, दादर, माटुंगा येथील फिर्यादी व त्यांचा भाऊ खिमजी पोपटलाल शाह व त्यांची मुले यांच्या मालमत्तांबाबत तपास चालू आहे अद्यापपर्यंत सदरच्या मालमत्ता या संयुक्त / एकत्रित कुंटूबाच्या होत्या याबाबत पुरावे समोर आलेले नाहीत. त्याबाबत तपास चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**केज (जि.बीड) येथील शासकीय फळ रोपवाटीकेच्या विविध कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबत**

**(३१) १०६४० (१९-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथील शासकीय फळ रोपवाटीकेला वॉल कंपाऊंड बांधकाम (४५६.०० लक्ष) तसेच सदर ठिकाणी तालुका कृषी अधिकारी कार्यालय व शेतकरी प्रशिक्षण केंद्र बांधकाम करणे (५००.०० लक्ष) या कामांचे अंदाजपत्रक मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागा शहराच्या मध्यभागी राष्ट्रीय महामार्गांवर मोक्याच्या ठिकाणी असून सदर जागेवर चारही बाजूने अतिक्रमण करण्यात आल्यामुळे सदर अंदाजपत्रकांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री महोदयांकडे दिनांक १९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन शासकीय फळ रोपवाटीकेच्या विविध कामांच्या अंदाजपत्रकांना मंजुरी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (१७-११-२०२५) :** (१) प्रस्तावित बांधकामाचे अंदाजपत्रक, प्रशासकीय व वित्तीय मान्यतेसाठी शासनास सादर करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर सुरु आहे.

(२) होय

(३) प्रस्तावित बांधकामाचा सविस्तर प्रस्ताव क्षेत्रीय कार्यालयाकडून प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मुळा मुठा व भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेस मध्ये रुपांतर करण्याबाबत**

**(३२) १०८८१ (१९-०८-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मुळा मुठा व भीमा नदीवर दहिटणे, राहू, पाटेठाण, म्हाळुंगी, वडगाव बांडे, आलेगाव पागा, पारगाव, सादलगाव, कानगाव, सोनवडी, खोरवडी, देऊळगाव राजे व पेडगाव येथे कोल्हापूर पद्धतीचे बंधारे बांधले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या बंधाऱ्यांच्या बांधकामांना अनेक वर्षांचा कालावधी झाला असल्याने त्यामधून मोठ्या प्रमाणात पाण्याची गळती होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुळा मुठा व भीमा नदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यांचे स्वयंचलित बॅरेजेस मध्ये रुपांतर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

सदर बंधाऱ्यांच्या बांधकामांना सुमारे २५ वर्षाचा कालावधी झाला असून त्यातून गळती होत आहे.

(३) होय, हे खरे आहे.

याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ०७.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये मागणी केली आहे.

(४) मुळा मुठा व भीमा नदीवरील दहिटणे, राहू, पारगाव, सादलगाव, कानगाव, सोनवडी, खोरवडी, देऊळगाव व पेडगाव या को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रूपांतरण करणेबाबत नियामक मंडळाचा ठराव क्र.११३/१० अन्वये को.प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करणेबाबतचे धोरण विचाराधीन असून सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रस्तावित को. प. बंधाऱ्यांचे बॅरेजमध्ये रुपांतरण करणेबाबत कार्यवाही करता येईल, असे निश्चित झाले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**दौंड (जि. पुणे) येथील पंचायत समितीची नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी यांच्या निवासस्थानाबाबत**

**(३३) १०८८३ (२४-०७-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) येथील पंचायत समिती नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी निवासस्थान बांधकामासाठी जलसंपदा विभागाची सर्व्हे नं. १२९९ मधील २.५ एकर जागा मिळणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधींनी दिनांक १४ फेबुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास केली हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जागेबाबतचा प्रस्ताव सादर करण्याचे आदेश जलसंपदा मंत्री यांनी कार्यकारी संचालक, कृष्णा खोरे विकास महामंडळ यांना दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (२९-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

दौंड (जि.पुणे) येथील पंचायत समिती नवीन इमारत व अधिकारी कर्मचारी निवासस्थान बांधकामासाठी जलसंपदा विभागाची सर्व्हे नं. १२९९ मधील २.५ एकर जागा मिळणेबाबतची मागणी श्री.राहुल कुल, मा.वि.स.स. दौंड यांनी मा. मंत्री (जलसंपदा) (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक १४/०२/२०२५ रोजीच्या निवेदनाद्वारे केली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या नियामक मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.११३/१२ अन्वये सदर जमीन रेडीरेकनर दरानुसार कायमस्वरुपी संबंधीताना हस्तांतर करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार क्षेत्रीय कार्यालयामार्फत पंचायत समिती, दौंड यांना रेडीरेकनर नुसार होणारी रक्कम भरणा करणेबाबत कळविण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जळगांव जिल्हा परिषद मधील प्रतीक्षा यादीतील अनुकंपाधारक यांच्या मागण्यांबाबत

**(३४) १११०३ (३०-०७-२०२५). श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्हा परिषद येथे सन २०२३-२४ पासून भरती प्रक्रिया राबवली गेली नसल्याने जळगांव जिल्हा परिषदेतील अनुकंपाधारकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रतीक्षा यादीत सुमारे १५० ते २०० अनुकंपाधारक असून त्यांना लवकरात लवकर जळगांव जिल्हा परिषदमध्ये भरती प्रक्रिया राबवून प्राधान्याने शासकीय नोकरीत सामावून घेण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये मा.ग्रामविकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी करुन त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.
(३) सन २०२३-२०२४ अखेर सरळसेवेच्या गट-क व गट-ड कोटयातील एकुण रिक्त पदांच्या २० टक्के मर्यादेनुसार संपुर्ण अनुकंपा नियुक्त्या देण्यांत आल्याने सदयःस्थितीत रिक्त पदे उपलब्ध नसल्यामुळे एकुण १६७ उमेदवार प्रतिक्षा यादीत शिल्लक आहेत. सन २०२५ मधे रिक्त होणाऱ्या पदांच्या अनुषंगाने उपलब्ध होणाऱ्या २० टक्के पदांवर अनुकंपा नियुक्तीची कार्यवाही करण्यांत येत असून शासनाच्या सुधारित धोरणानुसार गट-ड संवर्गात रिक्त असलेल्या परिचर पदांवर रिक्त पदांच्या प्रमाणात गट-क च्या अनुकंपा प्रतिक्षा सुचितील उमेदवारांकडून गट-ड मधे स्वेच्छने येण्याबाबतचे विकल्प देणाऱ्या एकूण ८६ उमेदवारांना गट-ड पदांवर नियुक्तीबाबतची कार्यवाही जि.प. मार्फत करण्यांत आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खेड (जि.पुणे) तालुक्यातील भामा व भीमा नदीवरील सर्व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे दुरुस्ती करणेबाबत

**(३५) १११८१ (१९-०८-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खेड (जि.पुणे) तालुक्यातील सिंचन पुर्नस्थापना निधी अंतर्गत भामा व भीमा नदीवरील सर्व कोल्हापूर पध्दतीचे बंधारे दुरुस्ती करणे आवश्यक असल्याने माहे एप्रिल, २०२५ मध्ये मागणी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भामा आसखेड धरणावरील सुरक्षेसह सुशोभिकरणाचे काम करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामे चासकमान व कळमोडी आणि कडूस लघु बंधारा याठिकाणी होणार आहेत काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे,

खेड (जि.पुणे) तालुक्यातील भामा व भीमा नदीवरील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे दुरुस्ती करणे आवश्यक असलेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २६/५/२०२५ रोजीच्या निवेदनान्वये क्षेत्रिय कार्यालयाकडे मागणी केली आहे. त्यानुसार क्षेत्रिय कार्यालयाने दिनांक २०/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये निवेदनाच्या अनुषंगाने अहवाल स्थानिक लोकप्रतिनिधींना सादर केला आहे.

(२) हे खरे नाही.

भामा आसखेड धरणाचे काम सन २०१० मध्ये पुर्ण झाले असून आवश्यकतेनुसार धरणाच्या देखभाल दुरूस्तीची कामे हाती घेण्यात येतात. तसेच धरणाच्या सुरक्षेसाठी तीन शिफ्टमध्ये आठ सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.

सद्य:स्थितीत भामा आसखेड धरणाच्या सुशोभिकरणाची आवश्यकता नाही.

(३) चासकमान, कलमोडी व कडुस लघु पाटबंधारे या प्रकल्पांतर्गत आवश्यकतेनुसार नियमित देखभाल दुरूस्तीची कामे हाती घेण्यात येतात. सद्यस्थितीत चासकमान व कलमोडी धरणावर तीन शिफ्टमध्ये प्रत्येकी सात सुरक्षा रक्षक कार्यरत आहेत.

तसेच सद्यस्थितीत चासकमान, कलमोडी व कडूस या धरणांच्या सुशोभिकरणाची आवश्यकता नाही.

(४) दिनांक २६/०५/२०२५ रोजीच्या लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने भामा नदीवरील कोरेगाव को.प.बंधाऱ्याच्या निम्न बाजुकडील उजव्या बाजुच्या गाईड वॉल, विअरींग कोटची दुरूस्ती व नव्याने भराव टाकणेसह भराव सुरक्षेचे काम तसेच पाबे व भोमाळे को.प.बंधाऱ्यांची पियर मधील स्लॅब, key wall, Diaphragm wall विअरींग कोटची दुरूस्ती व नव्याने भराव करण्याचे काम तात्काळ हाती घेण्यात आले आहे.

भिवेगाव-भोरगिरी सिमेवरील भिवेगाव को.प.बंधारा पुर्णपणे पडलेला असून त्यात पाणीसाठा करणे शक्य नाही. यास्तव सदर को.प.बंधाऱ्याचे काम विशेष दुरूस्ती अंतर्गत प्रस्तावित करून त्यानुसार प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

पाभे गावाजवळील पूरसंरक्षण भिंतीचे कामाचे प्रस्ताव व अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे. भामा आसखेड, चासकमान, कलमोडी व कडुस ल.पा. प्रकल्पांचे आवश्यकतेनुसार सिंचन /बिगरसिंचन प्रापणसूचीतील मंजूर निधीनुसार धरणाची देखभाल दुरूस्तीची कामे दरवर्षी करण्यात येतात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नागपूर मधील वर्ल्ड बँकेच्या अर्थसहाय्याने स्मार्ट कॉटन प्रकल्प उभारण्याबाबत

**(३६) ११८१० (०८-०९-२०२५). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर मधील वर्ल्ड बँकेच्या रुपये ३२० कोटीच्या अर्थसहाय्याने शासनाने स्मार्ट कॉटन प्रकल्पाची घोषणा केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अर्थसहाय्याद्वारे प्रत्यक्षात स्मार्ट कॉटन प्रकल्प न उभारता अधिकचा निधी जिनिंग तंत्रज्ञान अद्यावत करण्यासोबतच प्रकल्पाच्या प्रचार प्रसारावर अधिक निधी खर्च केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चीनने कापसाच्या धाग्याचा पिवळेपणा हे कारण देवून महाराष्ट्रातील कापूस खरेदी करण्यास नकार दिला, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कापसाच्या धाग्याची गुणवत्ता सुधारण्यास गुलाबी बोंड अळी प्रतिबंधक व्ही.आय.पी.३ ए. जीन असलेले बोलगार्ड-३ बियाणे उपलब्ध करून देणे गरजेचे असतांना सुध्दा शासनाच्या चुकीच्या नियोजनामुळे स्मार्ट कॉटन प्रकल्प पूर्णतः अयशस्वी झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संदर्भात चौकशी करून यामध्ये दोषी असलेल्या सबंधीतांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे,

कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या हितासाठी मा.बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पांतर्गत राज्यात १२ जिल्ह्यांमध्ये रु.९६.२२ कोटी खर्चाच्या "स्मार्ट कॉटन" उपप्रकल्पाची अंमलबजावणी सन २०२१ पासून सुरू करण्यात आली होती. कापूस मूल्यसाखळीचा सर्वसमावेशक विकास करणे तसेच उत्पादन, प्रक्रिया, ब्रँडिंग आणि विक्रीमध्ये शेतकऱ्यांचा थेट सहभाग वाढवून मूल्यवर्धन करणे हा या उपप्रकल्पाचा मुख्य उद्देश होता.
(२) हे खरे नाही,

स्मार्ट कॉटन उपप्रकल्पाच्या उद्दिष्टानुसार कृषी विस्तार विषयक कापूस मूल्य साखळी विकास शाळा अंतर्गत पिक प्रात्यक्षिके, शेतकरी प्रशिक्षण, अभ्यास दौरे, बाजार संमेलन व शेतीशाळा या घटकांची क्षेत्रीय स्तरावर अंमलबजावणी करण्यात आली होती. यासाठी उपलब्ध रु.२८.९८ कोटीच्या तरतूदीतून रु.१८.४९ कोटी जून-२०२५ अखेर साध्य झाले आहे. सदर निधीचा वापर मंजूर कृती आराखड्यानुसारच करण्यात आलेला आहे. जिनिंग तंत्रज्ञान अद्यावत करणे हा प्रकल्पाच्या आराखड्याचा भाग नव्हता.
(३) व (४) हे खरे नाही.

सन २०२१ ते २४ या कालावधीत प्रकल्पातील उपक्रमांचा सहभागी शेतकऱ्यांना लाभ झाला आहे. तथापि, प्रकल्पातील घटकांच्या अनुदानासाठीचा खर्च व अंमलबजावणी यंत्रणावरील आस्थापना खर्चाच्या प्रमाणात कापूस गाठी रूपांतरण अत्यल्प म्हणजेच एकूण सहभागी शेतकरी संख्येच्या तुलनेत कापूस गाठी प्रक्रियेत शेतकरी सहभागाची टक्केवारी १ ते १.५ % व वार्षिक लक्षांक १ लाख गाठीचे असताना चार वर्षाच्या कालावधीत प्रागतिक कापूस गाठी निर्मिती केवळ ९४५४ इतक्याच होऊ शकल्या. उद्दिष्टांच्या तुलनेत प्रकल्प लाभांकित होत नसल्यामुळे उद्दिष्टपूर्ती अभावी पुढे न राबविण्याचा निर्णय झाला आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

---

### रामानंद नगर (ता.पलूस, जि.सांगली) येथील झोपडपट्टीचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३७) ११९९३ (२५-०९-२०२५). श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामानंद नगर (ता.पलूस, जि.सांगली) येथील झोपडपट्टीवर कारवाई केल्याच्या निषेधार्थ येथील रहिवाशांनी पलूस पोलीस ठाणेच्या प्रवेशद्वारावर टाळ आंदोलन केले असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कारवाई दरम्यान रेल्वे अधिकाऱ्यांनी महिलांशी अश्लील वर्तन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार सदर झोपडपट्टीवरील कारवाई त्वरीत थांबविणेबाबत, स्थानिक नागरिकांना नुकसान भरपाई देवून त्यांचे पुर्नवसन करणेबाबत

व महिलांशी असभ्य वर्तन करणाऱ्या रेल्वे अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करणेबाबत कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस (१०-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) झोपडपट्टी अतिक्रमण कारवाईबाबत व स्थानिक नागरिकांचे पुनर्वसनाबाबत जिल्हाधिकारी, सांगली यांचे दालनात बैठक घेण्यात आली असून त्यांनी भूमीअभिलेख कार्यालय, सांगली यांना सदर जागेची मोजणी करून अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## कोल्हापूर परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांमधील कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज निवास व्यवस्था उभारण्याबाबत

**(३८) १२०१२ (०७-०८-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर परिक्षेत्रांतर्गत येणाऱ्या विविध पोलीस ठाण्यांमधील कर्मचाऱ्यांसाठी उपलब्ध असलेली निवासाची दुरवस्था झाली असून येथील व्यवस्था देखील अपुरी पडत असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पोलीस कर्मचाऱ्यांसाठी सुसज्ज निवास व्यवस्था उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०७-१०-२०२५) :** (१) होय.
(२) राजर्षी शाहू पोलीस संकुल, जुना बुधवार पेठ, कोल्हापूर येथे १६८ शासकीय निवासस्थानांचे बांधकाम पुर्ण झाले असुन ते पोलीस अधिकारी / अंमलदार यांचेसाठी वाटप करणेत आले आहे. तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ मर्या. वरळी, मुंबई यांचे मार्फतीने पोलीस मुख्यालय कोल्हापूर येथे २०४ निवासस्थाने, लक्ष्मीपुरी पोलीस लाईन येथे ९६ निवासस्थाने व कलानगर इचलकरंजी येथे २१० निवासस्थानांचे बांधकाम अंतिम टप्यात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील शेतकऱ्यांना परदेशी शेतीच्या तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी दौरे आयोजित करण्याबाबत

**(३९) १२२६० (२१-०७-२०२५). श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शेतकऱ्यांचा आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी वेगवेगळे तंत्रज्ञान शेतीत आणण्यासाठी शासनाकडून प्रयत्न करुन एक भाग म्हणून परदेशातील शेती तंत्रज्ञान राज्यातील शेतकऱ्यांना पाहता यावे यासाठी परदेश दौऱ्याचे आयोजन केले जाते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मागील दोन वर्षापासून शासनाकडून शेतकऱ्यांच्या परदेश दौऱ्यासाठी निधीची तरतूद आर्थिक वर्षाच्या शेवटी उपलब्ध करून दिली जात असल्याने हा दौरा रद्द झाल्याचे दिनांक २९ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शेतकऱ्यांना परदेशी शेतीच्या तंत्रज्ञानाची माहिती होण्यासाठी दौरे आयोजित करण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (३०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
१. सन २०२३-२४ या वर्षात सदर योजनेंतर्गत शेतकरी निवड करणे, अधिकारी निवड करणे व ई-निविदा प्रक्रिया अंतिम करणे ही प्रक्रिया दिनांक १६/०३/२०२४ पर्यंत चालू होती. लोकसभा निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने दिनांक १६/०३/२०२४ रोजी मध्यान्ह नंतर आचारसंहिता लागू झाल्याने दौरा आयोजित करता आला नाही.
२. सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात दिनांक ०३ मार्च, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली. सदर योजनेंतर्गत युरोप, ब्राझील, ऑस्ट्रेलिया या देशांचे दौरे आयोजित करण्याकरिता व्हिसा प्रक्रियेस लागणारा कालावधी तसेच शेतकऱ्यांनी अभ्यासदौ-याचा प्रवास खर्च जमा करणे, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करणे व शेतकऱ्याऱ्यांचे दौरापूर्व प्रशिक्षण आयोजित करणे यासाठी लागणारा कालावधी लक्षात घेता व प्रत्यक्ष प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यानंतर माहे मार्च अखेर परदेश अभ्यास दौरा आयोजित करून शेतकऱ्यांना अनुदान वितरीत करणे विहित वेळेत शक्य नसल्याने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात देखील परदेश अभ्यास दौरे प्रत्यक्ष आयोजित करता आले नाहीत.
(३) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिनांक १६ जून, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये सदर योजना राबविणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सदर मान्यतेच्या अनुषंगाने आयुक्त(कृषि) यांच्याकडून दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी क्षेत्रीय स्तरावर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच शेतकरी निवड प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. सदर योजनेंतर्गत युरोप, इस्राईल, जपान, चीन, दक्षिण कोरिया तसेच मलेशिया, व्हिएतनाम व फिलीपाईन्स या ३ देशांचा एकत्रित असे शेतकऱ्यांचे अभ्यासदौरे आयोजित करण्यासाठी प्रवासी कंपनीची निवड करण्याकरिता दिनांक १४ जुलै, २०२५ रोजी GeM पोर्टलवर ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर प्रक्रिया पूर्ण होताच दौऱ्याचे आयोजन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## करमाळा (जि.सोलापूर) येथील श्री क्षेत्र कमलाभवानी तिर्थक्षेत्रास सोयी-सुविधा व निधी उपलब्ध करणेबाबत

**(४०) १२९६७ (२५-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करमाळा (जि.सोलापूर) येथील 'ब' वर्ग दर्जा प्राप्त असलेल्या श्री क्षेत्र कमलाभवानी मंदिर या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी येणाऱ्या भाविकांची सोयी-सुविधा अभावी मोठी गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त तिर्थक्षेत्राचा विकास आराखडा तयार करुन आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार उक्त मंदिरास सोयी-सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार गोरे (१९-११-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) मा. लोकप्रतिनिधी यांचे श्री क्षेत्र कमलाभवानी ता. करमाळा, जि.सोलापूर या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करावयाच्या

आवश्यक विकास कामांचे निवेदन जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे दिनांक १७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पाठविण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुंबईतील धारावी व मुंबई उपनगर पुनर्वसन प्रकल्पातील सर्वच पात्र-अपात्र नागरीकांचे धारावीमध्ये पुनर्वसन करण्याबाबत

**(४१) १२९९३ (१८-०८-२०२५). श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील धारावी पुनर्वसन प्रकल्पातील सर्वच पात्र-अपात्र नागरीकांचे पुनर्वसन धारावीमध्येच करावे व मुंबई परिसरातील जागांचे हस्तांतर थांबवावे यासह इतर मागण्यांचे निवेदन मुंबई बचाव समिती, लोकप्रतिनीधींसह येथील रहिवाशींना मा.मुख्यमंत्री, मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे दिनांक १५ जुलै, २०२४ ते दिनांक २० जानेवारी, २०२५ रोजी तसेच वारंवार निवेदनाद्वारे मागण्या केलेल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,उक्त मागणीप्रमाणे अद्याप कोणताही निर्णय घेतलेला नसून धारावी पुनर्वसन प्रकल्पातील नागरीकांचे धारावीमध्येच पुनर्वसन करण्यासंदर्भात कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (३०-१०-२०२५) :** (१), (२) व (३) शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दिनांक ०५.११.२०१८ व दिनांक २८.०९.२०२२ नुसार धारावी पुनर्विकास प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली २०३४ च्या विनियम ३३ (९) (अ) व ३३ (१०) (अ) मधील तरतूदीनुसार धारावीचे पुनर्वसन प्रस्तावित आहे. त्यानुसार, पात्र निवासी व अनिवासी झोपडीधारक तसेच चाळी व इमारतींमधील पात्र रहिवाश्यांचे पुनर्वसन धारावीमध्ये करण्यात येणार आहे.

तसेच, धारावीतील अपात्र झोपडीधारकांचे शासन निर्णय, गृहनिर्माण विभाग, दिनांक २८.०९.२०२२ व दिनांक ०४.१०.२०२४ नुसार परवडणाऱ्या /भाडेतत्वावरील घरे देण्याच्या योजनेनुसार पुनर्वसन करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान राबविले जाणार असल्याबाबत

**(४२) १२९९९ (२१-०७-२०२५). श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्यात काही वर्षांकरिता नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने मंजुरी दिली असून १७०९ गावांमधील ८५,४५० हेक्टरवर राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान राबविले जाणार असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अभियानासाठी राज्य शासनाने रुपये २५५ कोटी ४५ लाख प्रस्तावित केले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी करुन राज्यात नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी नैसर्गिक शेती अभियान राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (२६-०९-२०२५) :** (१) नैसर्गिक शेतीला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यात राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियान सन २०२५-२६ पासून राबविण्यात येत आहे. अभियानांतर्गत एकूण १,७०९ गट स्थापन केले असून ८५,४५० हे. क्षेत्रावर योजनेची अंमलबजावणी करावयाची आहे.

(२) होय.

(३) सद्यस्थितीत अभियानांतर्गत १७०९ गट स्थापन केलेले आहेत. एकूण २.१२ लाख शेतकऱ्यांच्या ८४,५६७ हे. क्षेत्राची निवड केली आहे. जनजागृती, ओरीएंटेशन कार्यक्रम, शेतकरी प्रशिक्षण, कृषी सखी प्रशिक्षण याद्वारे नैसर्गिक शेतीचा प्रचार व प्रसार करण्यात येत आहे. गट स्तरावर ९५२ जैव निविष्ठा संसाधन केंद्रांसाठी जागेची निवड करण्यात आली आहे

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात कृषी विभागाची ग्रामबीजोत्पादन योजना पुन्हा सुरु करण्याबाबत

**(४३) १३०९७ (०८-०९-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना दरवर्षी पिकांची लागवड करण्यासाठी बियाण्यांची गरज पडत असून कृषी विभागाकडून पूर्वी शासनामार्फत ग्रामबीजोत्पादन योजना राबविण्यात येत होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बीजनिर्मिती व त्यावर आवश्यक ती प्रक्रिया करण्यासाठी शासनाकडून अनुदान देण्यात येत असल्यामुळे शेतकऱ्यांना गावात वा जवळपासच्या गावात चांगल्या दर्जाचे बियाणे कमी दरात उपलब्ध होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या योजनेत बियाणे उत्पादन करणाऱ्यालाही अधिकचा भाव उत्पादनासाठी मिळत होता, परंतु सध्या ही योजना बंद असल्याने शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन कृषी विभागाची ग्रामबीजोत्पादन योजना पुन्हा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (२६-११-२०२५) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही, शेतकऱ्यांनी जतन केलेल्या बियाण्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी "बियाणे व लागवड साहित्य उपअभियान" या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत "ग्रामबिजोत्पादन कार्याक्रम" व "ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमातून प्रमाणित बियाणे उत्पादन" या दोन घटकांची अंमलबजावणी केली जात होती. सन २०२५-२६ मध्ये "बियाणे व लागवड साहित्य उपअभियान" या योजनेचे नाव व स्वरुप बदलले असून तिचे नामाभिधान "कृषि उन्नती योजना-राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत बियाणे घटक" असे केले आहे. सदर योजनेअंतर्गत "बियाण्यांच्या नविन जातींना प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य" हा नवीन उपघटक समाविष्ट केला आहे, ज्यात पूर्वीचा "ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम" व "ग्रामबिजोत्पादनाद्वारे प्रमाणित बीज उत्पादन" हे घटक समाविष्ट केले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कृष्णा कॅनॉलमधील जलपर्णी समूळ नष्ट करणेबाबत**

**(४४) १३१३८ (१९-०९-२०२५). श्री.अतुलबाबा भोसले (कराड दक्षिण) : दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २१ मधील प्रश्न क्रमांक ६०८२ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **जलसंपदा(गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृष्णा कॅनॉलच्या माध्यमातून १३ हजार हेक्टर क्षेत्रातील गावांमधील शेतीला पाणीपुरवठा होतो, यामध्ये कराड तालुका व सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस, तासगाव, मिरजमधील काही भागाचा समावेश आहे, कृष्णा कॅनॉल हा ८६ कि.मी. लांबीचा असून उन्हाळयात या कॅनॉलवर अवलंबून असणाऱ्या शेती क्षेत्राला मोठा आधार मिळतो हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कॅनॉलची अवस्था खूपच दयनीय असून अनेक भागात जलपर्णीचा विळखा वाढला आहे, गवत, झाडे, झुडपे व वेलींनी कॅनॉल व्यापला असून पाण्याचे पात्र दिसत नसून पाण्याच्या प्रवाहाला अडथळा निर्माण झाला आहे, त्यामुळे पुढील गावांपर्यंत पाणी गतीने पोहचण्यास अडचणी निर्माण होत असून कॅनॉलवर अवलंबून असलेल्या शेती पाण्याचा प्रश्न गंभीर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. राधाकृष्ण विखे-पाटील (१७-१०-२०२५) :** (१) हे खरे आहे.

कृष्णा कालव्याची लांबी ८६ कि.मी. असून त्याद्वारे सातारा जिल्ह्यातील कराड तालुका व सांगली जिल्ह्यातील वाळवा, पलूस, तासगांव व मिरज तालुक्यातील एकूण १३३६६ हे. क्षेत्रास सिंचनासाठी पाणी देण्यात येत आहे.

(२) हे अंशत: खरे आहे.

कृष्णा कालवा ब्रिटीश कालीन असून या कालव्याचा बहुतांश भाग काळ्या मातीतून जातो तसेच या भागात पर्जन्यमान तुलनेने जास्त असल्याने कालव्याच्या काही भागात गवत, झाडे, झुडपे, वेली व जलपर्णींची वाढ झाल्याने पाण्याची पातळी दिसत नाही. त्यामुळे काही साखळी क्रमांकामध्ये पाण्यास अडथळा निर्माण होऊन पाणी गतीने पोहोचण्यास अडचण निर्माण होत आहे.

(३) व (४) कृष्णा कॅनॉल मधील जलपर्णीं नष्ट करण्यासाठी व गवत, झाडे, झुडपे, गाळ काढण्यासाठी यांत्रिकी विभागामार्फत मशिनरी उपलब्ध करून घेऊन कामे सुरू आहेत.

तसेच या कालव्यामधील जलपर्णी नष्ट करण्यासाठी व कृष्णा कालवा काटछेद पूर्ववत करण्याकरीता विशेष दुरूस्ती अंतर्गत ५ कामांपैकी ४ कामे सध्या प्रगतीत असून एका कामाचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. प्रगतीपथावरील कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील क्रीडा विभागातील रिक्त पदांमुळे**
**निर्माण झालेल्या अडचणीबाबत**

**(४५) १३६९५ (०८-०९-२०२५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात ११ तालुके असूनही कोणत्याही तालुक्यात क्रीडा अधिकाऱ्याची नियुक्ती नसल्यामुळे क्रीडा विभागाच्या कामकाजावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शालेय तसेच महाविद्यालयीन स्तरावरील खेळाडूंना संधी व सुविधा मिळण्यात अडथळे येत असल्याचे माहे जून, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, जिल्ह्यातील क्रीडा संकुलांची कामे सुरु आहेत की नाही याची तपासणी न होणे, तसेच क्रीडा सप्ताह, जिल्हास्तरीय शालेय व महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धांचे नियोजन योग्यप्रकारे न होणे यामुळे विद्यार्थ्यांचे व खेळाडूंचे नुकसान होत आहे हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, देशात 'खेलो इंडिया' योजनेत यश मिळवणाऱ्या खेळाडूंना विविध पदांवर नियुक्ती देण्यात येते, परंतु त्यांना क्रीडा विभागातच काम करण्याचे बंधन घालण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील क्रीडा अधिकाऱ्यांची पदे तसेच क्रीडा कार्यालयातील आवश्यक मनुष्यबळाची तात्काळ भरती करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार (१७-११-२०२५) :** (१) नाही,
(२) नाही,
(३) नाही,
(४) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक ०९.०७.२०२४ अन्वये महाराष्ट्र राज्यातील अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडूंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्यासंदर्भात सुधारित धोरण निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार खेळाडूंना नियुक्त्या देण्यासाठी क्रीडा व युवक संचालनालयाच्या आस्थापनेवर एकूण ५५१ पदे निर्माण करण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार खेळाडूंना थेट नियुक्ती देण्यात येते.
(५) सोलापूर जिल्हयातील तालुका क्रीडा अधिकारी यांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात तसेच क्रीडा कार्यालयातील रिक्त पदे भरण्यासंदर्भात कार्यवाही करण्यात येत आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या लाभात वाढ करण्याबाबत

**(४६) १४३७७ (१९-०८-२०२५). श्री.गजानन लवटे (दर्यापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाच्या "नमो शेतकरी महासन्मान" योजनेव्दारे वर्षाला सहा हजारांऐवजी नऊ हजारांचा लाभ राज्यातील शेतकऱ्यांना देण्याची घोषणा मा.मुख्यमंत्री महोदयांनी पंतप्रधान किसान सन्मानाच्या २० व्या वितरण सोहळयात केली होती, हे खरे आहे काय,
(२) तसेच राज्य शासनाच्या "नमो शेतकरी महासन्मान" सातवा हप्ता व केंद्र शासनाच्या "पंतप्रधान किसान सन्मान" या योजनेचा २१ वा हप्ता राज्यातील २.७४ लाख शेतकऱ्यांना माहे मे, २०२५ मध्ये अद्यापही मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर प्रलंबित हप्ता शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करुन राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेच्या लाभात वाढ करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (०९-१०-२०२५) :**(१) होय,
(२) व (३) राज्य शासनाच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेचा सातवा हप्ता व केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता राज्यातील शेतकऱ्यांना वितरीत करण्यात आला आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २०.०३.२०२५ रोजी झालेल्या बैठकीत “नमो शेतकरी महासन्मान निधी” योजनेतील लाभाची रक्कम वाढविण्यापेक्षा, कृषि क्षेत्राकरिता पायाभूत सुविधा निर्मितीवर भर देणारी नवीन योजना तयार करण्याचे निर्देश देण्यात आले. त्यानुसार राज्यातील कृषि क्षेत्रात भांडवली गुंतवणूक वाढून पायाभूत सुविधांच्या निर्मितीवर भर देणारी कृषि समृध्दी योजना सन २०२५-२६ पासून राबविण्यास राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## श्री जालिंदर सुपेकर व श्री अमिताभ गुप्ता यांनी गैरकारभाराने पिस्तुल परवाने देवून मिळविलेल्या बेहिशोबी मालमत्तेची सखोल चौकशी करण्याबाबत

**(४७) १४४८५ (०४-०७-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यात श्री.जालिंदर सुपेकर व श्री.अमिताभ गुप्ता या दोघांनी मिळून प्रत्येकी २० लाख रुपये घेऊन ५६९ पिस्तुल परवाने दिल्यामुळे पुणे जिल्हा व परिसरात गुंडगिरी व दहशत मोठ्या प्रमाणात वाढली आहे, हे ही खरे आहे काय,

(२) तसेच श्री.सुपेकर यांनी त्यांचे मेहुणे श्री.शशीकांत चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या पत्नीच्या नावे पुणे शहर व परिसरात मोठमोठे बांधकाम व्यवसाय शासनाच्या परवानगी शिवाय सुरु केले असून यामध्ये हजारो कोटींची रक्कम गुंतविली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच श्री.सुपेकर व श्री.चव्हाण यांच्या सातारा, महाबळेश्वर, वाई, पुणे, नवी मुंबई, ठाणे व अहमदनगर जिल्ह्यात हजारो कोटी रुपयांच्या बेहिशोबी मालमत्ता स्वतःच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने खरेदी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने उक्त अधिकाऱ्यांच्या पत्नीच्या व नातेवाईकांच्या मालमत्तेची चौकशी करण्याकरिता त्यांना निलंबित करून अंमलबजावणी संचालनालय (ED) व केंद्रीय अन्वेषण विभागा (CBI) मार्फत कारवाई करण्यात येणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०८-०७-२०२५) :** (१) पुणे शहर पोलीस आयुक्तालयामधील श्री. जालिंदर सुपेकर व श्री. अमिताभ गुप्ता या अधिकाऱ्यांच्या सेवा कालावधी दरम्यान एकूण ४३३ शस्त्र परवाने मंजूर केले आहेत. सदर परवाने देताना संबंधित परवाना प्राधिका-यांनी शस्त्र अधिनियम १९५९ व शस्त्र नियम २०१६ मधील अटी, शर्ती व तरतुदींचे पालन करून शस्त्र परवाने प्रदान केले आहेत.

सन २०२० ते जून, २०२५ या कालावधीत परवानाधारक शस्त्र वापरल्याने १० गुन्हे दाखल झाले असून दाखल गुन्ह्यातील आरोपींना अटक करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) श्री. जालिंदर सुपेकर यांच्याविरुध्द अशा प्रकारची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयात प्राप्त नाही. श्री. शशिकांत चव्हाण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचेविरुध्द दिनांक ११/०३/२०१६ रोजी तक्रार अर्ज प्राप्त झालेला होता.

यासंदर्भात महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या दिनांक १९/९/२०१९ रोजीच्या आदेशानुसार श्री. शशिकांत चव्हाण व त्यांचे कुटुंबियांच्या मालमत्तेची उघड चौकशी करण्यात आली होती.

या चौकशीमध्ये श्री. चव्हाण व त्यांच्या कुटुंबियांच्या नावे पुणे व सातारा जिल्हयामध्ये मालमत्ता असल्याचे आढळून आली आहे. श्री. चव्हाण यांची सदरची मालमत्ता अपसंपदा असल्याचे निष्पन्न झाले नाही. त्यामुळे सदरची उघड चौकशी दिनांक ०३/०३/२०२० रोजी बंद करण्यात आली होती.

श्री. सुपेकर व त्यांच्या नातेवाईकांच्या मालमत्तेची चौकशी करण्याकरिता दिनांक १७/०६/२०२५ रोजी प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रकरण तपासून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात जळगाव जिल्ह्यात महाडीबीटी योजनेंतर्गत ठिबक सिंचनाचे अनुदान वितरित करण्याबाबत**

**(४८) १४५२० (०८-०९-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) : तारांकित प्रश्न क्रमांक ११४९ ला दिनांक ६ मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात:** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात जळगाव जिल्ह्यात महाडीबीटी योजनेंतर्गत ठिबक सिंचन योजनेत सहभागी होणाऱ्याच शेतकऱ्यांना ठिबक सिंचनाचे अनुदान दिले जाते तथापि प्रत्यक्षात अनुदान मिळविण्यासाठी बरीच वर्षे प्रतिक्षा करावी लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात महाडीबीटी पोर्टलवर ठिबक सिंचन योजनेंतर्गत किती अर्ज प्रलंबित आहेत,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन तसेच सदर प्रक्रियेत सुधारणा करुन ठिबक सिंचनाचे अनुदान वितरित करण्यासाठी कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (२७-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) जळगाव जिल्हयातील प्रधानमंत्री सुक्ष्म सिंचन योजनेंतर्गत सन २०२३-२४ मध्ये ३६,४५८ अर्ज अनुदानाकरिता मंजूर करण्यात आले होते. त्यापैकी ३६,३९७ अर्जांना अनुदान अदायगी करून सर्वसाधारण प्रवर्गाचे ६१ अर्ज अनुदानाकरिता शिल्लक आहेत. दुसऱ्या हप्त्याचा निधी प्राप्त झाल्यानंतर उर्वरित ६१ सर्वसाधारण प्रवर्गातील लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येणार आहे.

तसेच सन २०२४-२५ मध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील ८१३ अर्ज अनुदानाकरिता मंजूर करण्यात आले आहे. त्यापैकी ८०८ अर्जांना अनुदान अदायगी करून ५ अर्ज बँक ॲप्रुव्हल नसल्याकारणाने अनुदानाकरिता प्रलंबित आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (पोकरा) ही योजना जाहीर होऊनही शेतकऱ्यांना सुविधा न मिळाल्याबाबत**

**(४९) १४७८२ (०८-०९-२०२५). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) टप्पा दोन अंतर्गत १७३ गावांचा समावेश करण्यात आला असून सदर योजना जाहीर होऊन सहा महिने उलटूनही शेतकऱ्यांना ठिबक सिंचन, तुषार सिंचन, सेंद्रिय खते व इतर सुविधा मिळालेल्या नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पदावर मागील सात महिन्यांपासून प्रभारी अधिकारी कार्यरत असल्यामुळे सदर योजनेच्या अंमलबजावणीसाठी दिरंगाई होत असून "पोकरा" सारखी महत्वाकांक्षी योजना केवळ कागदोपत्रीच मर्यादीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होऊन त्याचा लाभ प्रत्यक्ष शेतकऱ्यांना मिळण्याकरीता तसेच जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी पदी पूर्णवेळ अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने कोणती निर्णयात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. दत्तात्रय भरणे (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

कृषि व पदुम विभागाच्या शासन निर्णय दिनांक १४.१०.२०२४ अन्वये परभणी जिल्हयातील १७३ गावांमध्ये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंमलबजावणीस मान्यता देण्यात आली आहे. जागतिक बँकेसमवेत प्रकल्प करार व कर्ज करार करण्याबाबत कार्यवाही सुरु असून सदर करार झाल्यानंतर प्रकल्पाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीस सुरुवात होणार आहे.

(२) हे खरे नाही.

प्रकल्प टप्पा-२ च्या अनुषंगाने निवडलेल्या गावांतील सरपंच प्रशिक्षण, कृषिताई निवड, ग्राम कृषि विकास समिती सदस्यांचे प्रशिक्षण, खरीप शेतीशाळा, गावस्तरीय हवामान अनुकूलन आराखडे तयार करणे इत्यादी कामे करण्यात आली आहेत.

(३) कृषि व पदुम विभागाच्या दिनांक ०५.०८.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पासाठी पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. सदर आकृतीबंधानुसार जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी कार्यालयात नोडल अधिकारी, प्रकल्प विशेषज्ञ (मनुष्यबळ विकास), प्रकल्प लेखा सहायक अशा ३ पदांची निर्मिती करण्यात आलेली आहे. सदर पदांवर अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्तीबाबत कार्यवाही सुरु आहे.

(४ ) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सूर्यकांत प्रजापती यांच्या आत्महत्येप्रकरण**

**(५०) १५४०० (०८-०९-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील सूर्यकांत प्रजापती यांच्या आत्महत्येप्रकरणी चाकण पोलिस ठाण्यात बीएनएस २०२३, कलम १०८ आणि ३(५) अंतर्गत एफआयआर दिनांक २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान दाखल करण्यात आला असून, यामध्ये आरोपी बापू सोनवणे आणि मनीषा केदार सिंग यांचा अंतर्भाव असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणात आरोपी यांचे पोलीस ठाण्यातील अधिकारी / कर्मचारी यांचेशी हितसंबंध असल्याचे मयत व्यक्तीच्या कुटुंबियांचे म्हणणे असून सदर प्रकरण दडपण्याचा प्रयत्न होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच आरोपीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. देवेंद्र फडणवीस (०३-११-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सदरचे प्रकरण कोणत्याही प्रकारे दडपण्यात आलेले नसून आरोपींविरुद्ध गुन्ह्याचा तपास पूर्ण करुन आरोपी बापू सोनवणे आणि मनीषा केदार सिंग यांचेविरुद्ध बी.एन.एस कलम १०८, ३५१ (४), ३(५) अन्वये दोषारोपपत्र मा. न्यायालयात दिनांक ३१/०७/२०२५ रोजी सादर करण्यात आलेले आहे. त्याचा दोषारोपपत्र क्र. ३११/२०२५ असा आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री. जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

वि.स. २३ (37)

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.